वर्ष : सोळावे
जुलै २०२४
अंक : सातवा
मूल्य २० रुपये
पृष्ठसंख्या ५६


# राजहंस ग्रंथवेध


ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ


आपल्याही नकळत आपल्या रोजच्या जगण्याचा भाग झालेल्या टीव्ही मालिका.
त्याबद्दल स्वत:ला आणि प्रेक्षकांना पडणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरं देणारं,
'मालिका' या विषयावर मार्गदर्शन करणारं
अभिनेत्री व लेखिका **मुग्धा गोडबोले** यांचं पुस्तक...



हिमालय अनेकांना वेड लावतो. का? कसं?
एव्हरेस्टसारखं अत्युच्च शिखर सर केल्यानंतरही गिर्यारोहकांची पावलं
पुन:पुन्हा हिमालयाकडे का वळतात?
पर्वतराजीतील भव्यता आणि शांतता, रौद्रता आणि सात्त्विकता त्यांना भुरळ पाडत असते?
की निसर्गाचा लहरीपणा त्यांच्यातील धाडसी, अपराजित वृत्तीला सतत आव्हान देत असतो?
अशा वेळी त्यांचे प्रियजन कशी साथ देत असतील?
एव्हरेस्ट शिखर सर करण्याच्या अनावर ओढीपायी तीन पिढ्यांमध्ये निर्माण झालेले
ताणतणाव, संघर्ष आणि परस्परांना समजून घेण्याचे प्रयास चित्रित करणारी -
'सत्य हे कल्पनेपेक्षा अद्भुत असतं' याचा प्रत्यय देणारी -
सत्यघटनेवर आधारित कादंबरी!




ज्याचं
त्याचं
एव्हरेस्ट
मृणालिनी चितळे

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

# राजहंस ग्रंथवेध

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
आरती घारे

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

मुखपृष्ठ-आतील मांडणी :
तृप्ती देशपांडे

वर्ष सोळावे :
अंक सातवा
१५ जुलै २०२४
मूल्य : ₹ २०/-

अनुक्रम :

- संपादकीय / ५
- राजहंसी विशेष
  *अथक चालणे हाच मुक्काम :*
  *योगी चालता भला : विनय हर्डीकर ७५!*
  - शिरीष सहस्रबुद्धे / ९
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  *द सीक्रेट मिशन* – राधिका कुलकर्णी / १३
- गाऊ त्यांना आरती
  *जेआरडी - मी पाहिलेले* / १९
- चित्र पाहीन आवडी : नितीन हडप / २७
- असे जन्मले पुस्तक!
  *फकिरी* – दत्ता बारगजे / ३१
- आठवणींच्या खिडकीतून
  *वास्तववादाची ऐशीतैशी*
  – माधव वझे / ३५
- क... कवितेचा
  - राजीवलोचन श्रीधर पुंडलीक / ३९
- उद्गार
  *पत्र आणि मैत्र* व *वाणी आणि लेखणी :*
  *दिलीप माजगावकर* / ४१
- राजहंसी पार / ४५
- वाचकांच्या मनातलं... / ४९

---

या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९/२४४६५०६३.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




चीन जितका आधुनिक, तितकाच ऐतिहासिकही.
आजही भारताबरोबरचा संघर्ष असेल वा अमेरिकेशी स्पर्धा-
चिनी सत्ताधीश आपली धोरणं ठरवताना इतिहासात
दडलेल्या सूत्रांचा आधार घेत असतात. हे चकित
करणारं विलक्षण चिनी प्रारूप समजावून देणारं-

### मेड इन चायना

गिरीश कुबेर

किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

एका सच्च्या समाजवाद्याचं उदास, चिंतनशील स्वगत.
अनेक अंतर्विरोधांनी ग्रासलेलं भारताचं बहुआयामी
समाजजीवन चंद्रशेखरांनी पुस्तकात सजीव केलंय.
पुस्तकात चंद्रशेखर म्हणतात,
'राजकारण सत्यावर चालत नाही हेच खरं.'
**- अंबरीश मिश्र**




### चंद्रशेखर : जसं जगलो तसं

अनुवाद : अंबरीश मिश्र

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ५०)




'कितीही अडचणी, वाईट प्रसंग आले, तरी डरायचं नाही'
असा संदेश देणारी वेलवर्गीय वनस्पती - 'दौशाड'!
तिचाच आदर्श घेऊन माणदेशातील माणसं हिमतीनं
जगत असतात. त्यांची कहाणी सांगणारं...

### दौशाड

डॉ. नंदकुमार राऊत

किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ५०)

# संपादकीय

*पूर्वी लिहिता-वाचता येणे म्हणजे साक्षर होणे होते. आता त्याचबरोबर 'सायबर-साक्षर' होणे, ही काळाची गरज बनली आहे. त्या दृष्टीने काय काय करता येईल, याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे.*

नमस्कार वाचकहो,

वर्तमानपत्रात मध्येमध्ये येणाऱ्या बातम्या आपण सगळेच बहुतेक वाचत असतो.. उदाहरणच घ्यायचे तर, 'पार्सलमध्ये अमली पदार्थ आढळून आल्याची भीती दाखवत तरुणीला घातला २२ लाख ९५ हजारांचा गंडा. फिर्यादी तरुणीला सायबर चोरट्यांनी फोन करून सांगितले की, तुमच्या नावाने फेडेक्समधून आलेले पार्सल डिलिव्हरीसाठी थांबविण्यात आले आहे. त्यामध्ये पाच अवैध पासपोर्ट, लॅपटॉप, कपडे आणि अमली पदार्थ आहेत. याबाबत तुमच्यावर मुंबईतील गुन्हे शाखेत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान तुमची आम्हाला चौकशी करावी लागेल. त्या बहाण्याने स्काईपद्वारे सायबर ठगाने आरबीआय अधिकारी बोलत असल्याची बतावणी करून बँक खाते तपासण्याच्या बतावणीने फिर्यादींच्या खात्यावरील २२ लाख ९५ हजार रुपये ट्रान्सफर करून घेतले. खात्यावरील पैसे कमी झाल्यानंतर तरुणीला आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले.'

दुसरे उदाहरण, 'शेअर ट्रेडिंगद्वारे दहा लाखांची फसवणूक : शेअर बाजारातील गुंतवणुकीवर आकर्षक परतावा देण्याच्या बहाण्याने सायबर चोरट्यांनी एकाला नऊ लाख ८४ हजारांचा गंडा घातला.'

या आणि अशा बातम्या सध्या आपल्या वाचनात अनेकदा येत असतात. 'हे ॲप वापरून बघा', 'या लिंकवर क्लिक करा', 'हा नंबर डायल करा' असे संदेश आपल्या हातातल्या मोबाईलवर येत असतात. कधी उत्सुकतेने, कधी झटपट श्रीमंत होऊ या कल्पनेने, तर कधी अज्ञानाने बरेच जण या संदेशांना बळी पडतात आणि या घटना पापणी लवण्याच्या आत घडून जातात. यामध्ये अगदी कोवळ्या वयातील मुलांपासून उच्चशिक्षित व्यक्तींपर्यंत सगळेच अडकले जातात. तरीही या गोष्टी म्हणाव्या तितक्या समाजापुढे येत नाहीत. खरे तर 'पुढच्यास ठेच मागचा शहाणा' या वचनाप्रमाणे हे कमी व्हायला हवे, पण प्रमाण वाढतच आहे. आपली

बदनामी होईल असे वाटल्याने आणि आपण फसवले गेलो, हे सांगण्याची लाज वाटत असल्याने अनेक जण पोलिसांनी आवाहन करूनही या गुन्ह्यांची तक्रार करायला पुढेच येत नाहीत.

आज जागतिकीकरणामुळे आणि आंतरजालामुळे केवळ देशातीलच नाही, तर परदेशांतील व्यक्ती आणि संस्थांकडून ही फसवाफसवी सुरू असते. हे गुन्हे कधी वैयक्तिक पातळीवर, तर कधी संघटित पातळीवर केले जातात. 'एकमेकां साह्य करू' या वचनाप्रमाणे या गुन्ह्यातही ही मंडळी एकमेकांकडून वेगळ्या वेगळ्या युक्त्या शिकत असतात. भारतातील काही राज्ये ही या गुन्ह्यांसाठी ओळखली जातात. विशेषत: झारखंड, बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान, दिल्ली, हरयाणा या राज्यांत सायबर गुन्हेगारी वाढत आहे. या व्यक्तींना फोनवर बोलायचे कसे, समोरच्या व्यक्तीला आपल्या जाळ्यात अडकवायचे कसे याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण दिले जाते; याचे वर्गही अनौपचारिकरीत्या चालवले जातात. परदेशांतील नायजेरिया, तुर्कस्थान, अमेरिका, चीन येथील सायबर चोरटे निरनिराळ्या मार्गांनी पैसे मिळवत असतात. विशेषकरून आयात-निर्यात करणाऱ्या कंपन्या यासाठी निवडल्या जातात. हे गुन्हेगार दवाखाने, मोठे व्यावसायिक, बँका, कंपन्या यांच्या सर्व्हरवर सायबर-हल्ला करून तिथल्या मूळ डेटामध्ये फेरफार करतात आणि तो हवा असल्यास त्यासाठी खंडणी मागतात. अल्पवयीन मुले, महिला यांचे लैंगिक शोषण करणारे बहुतांशी गुन्हे हे परदेशी सायबर-गुन्हेगारांनी केल्याचे दिसून येते. महिला, मुली यांना लग्नाचे आमिष दाखवून फसवणे, भेटवस्तू पाठवली आहे, असे सांगून अमुक अमुक खात्यात पैसे भरा असे सांगून फसवणूक केली जाते. या गुन्ह्यांत अनेकदा मुख्य सूत्रधार परदेशी असतो आणि स्थानिक व्यक्तींकडून तो हे गुन्हे करवून घेत असतो. कधी कधी अतिआत्मविश्वासही नडतो. आपण फसवलो गेलो आहोत, हे समजत असूनही मंडळी पैसे परत मिळवण्यासाठी काही रक्कम भरतात आणि मग लक्षात येते, आपण पुन्हा फसवलो गेलो आहोत. मग पोलिसांकडे तक्रार नोंदवली जाते. पण दुर्दैवाने ज्या प्रमाणात गुन्हे घडतात, त्या प्रमाणात तक्रार करण्यासाठी लोक पुढे येत नाहीत.

असे काहीतरी आपल्या बाबतीत घडू नये, यासाठी काही ठोस उपाययोजना करता येईल का, किंवा निदान अशा गोष्टी समोर आल्या, तर आपण काय काळजी घ्यायची याची थोडीफार कल्पना आली तरी आपण स्वत:ला तसेच आपल्या आजूबाजूच्या व्यक्तींना वाचवू शकतो. मंडळी, तंत्रज्ञान चांगले की वाईट, हा मुद्दा चघळत बसण्यापेक्षा आपण काय करू शकतो, हे या बाबतीत महत्त्वाचे आहे. वर्तमानपत्रातही याबद्दल अनेक वेळा लेख प्रकाशित होत असतात. ग्रंथजगतानेही वेळोवेळी प्रबोधन करण्यासाठी हातभार लावला आहे आणि कायमच काळाची

गरज ओळखून त्या दृष्टीने पुस्तके प्रकाशित केली आहेत.

हे सर्व तुम्हाला सांगायचे कारण की, आमच्या प्रकाशनाने नुकतेच 'सायबर ॲटॅक' हे पुस्तक प्रकाशित केले. सर्वसामान्य माणसाला समजेल अशा भाषेत यामधून कथांच्या माध्यमातून सायबरविश्वातील गुन्हेगारी वाचकांसमोर ठेवली आहे. मुळात सायबर-गुन्ह्यांबद्दल लोकांना साक्षर करणे, त्यातून ते स्वत:चा बचाव तर करतील, पण आपल्या जवळच्या लोकांनाही त्यापासून परावृत्त करतील; या उद्देशाने या पुस्तकाचे लेखक वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. संजय तुंगार आणि पत्रकार सुधीर साबळे यांनी हे पुस्तक लिहिले आहे. मोबाईलवरून किंवा समाज माध्यमांतून गोड संवाद साधून अनेकांना आपल्या जाळ्यात अडकवणाऱ्या ठकसेनांपासून स्वत:चा बचाव करायचा एकच मार्ग, म्हणजे सजग राहणे, या जाळ्यात न अडकणे. त्यासाठीच हे पुस्तक वाचून त्यातून योग्य ते धडे घ्यायचे, सावधपणे पुढच्या हाका आधीच ऐकायच्या; असे या लेखकद्वयीला वाटते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मोहक मुखवट्यापासून सर्वांना सतर्क करणारे हे पुस्तक आहे.

या पुस्तकातल्या कथांची नुसती नावे वाचली, तरी तुमच्या लक्षात येईल की, किती विविध पद्धतींनी हे गुन्हे घडत असतात. उदाहरणच द्यायचे तर, 'हरवलेला सापडला', 'हातचलाखी', 'पेट्रोल-पंप मिळाला अन् पैसे गेले', 'टेक्नॉलॉजी भारी... परीक्षा पास करी...', 'एक क्लिक भोवली...' इत्यादी. अशा ३६ कथा आणि माहितीपूर्ण अशी तीन परिशिष्टे पुस्तकात शेवटी दिलेली आहेत. या परिशिष्टांतून वाचकांना सायबर-गुन्ह्यांची सध्याची आकडेवारी, तसेच सायबर-गुन्ह्यात गेलेले पैसे परत कसे मिळवायचे याबद्दलची माहिती आणि अशा प्रकारे आपण फसवलो गेलो आहोत, हे समजल्यावर 'आयटी ॲक्ट'च्या द्वारे तक्रार कशी दाखल करायची याचीही सविस्तर माहिती दिलेली आहे. त्यासाठीचा नमुना अर्जही पुस्तकात वाचकांना पाहायला मिळेल. आणि हो, आमच्या 'राजहंसी मोहोर' या पॉडकास्टच्या माध्यमातून तुम्ही या पुस्तकाच्या लेखकद्वयीकडून पुस्तकाबद्दल आणखी माहिती ऐकू शकता.

वाचकहो, पूर्वी लिहिता-वाचता येणे म्हणजे साक्षर होणे होते. आता त्याचबरोबर 'सायबर-साक्षर' होणे, ही काळाची गरज बनली आहे. त्या दृष्टीने काय काय करता येईल, याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे.

***आरती घारे***
कार्यकारी संपादक

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेले ‘राजहंसी’ काव्यसंग्रह



निवडुंगातून फूल यावे, तसे कवीच्या काटेरी अनुभवाला आलेले
करुणेचे फूल या कवितांना साद घालते.
कवीची भाषा करुणेचा स्वर लाभलेली
सत्याची भाषा आहे.

### व्याकुळ पिंपळ

हिमांशु कुलकर्णी

किंमत : ₹ १२०/- । (ट.ख. ₹ ५०)

हिमांशु कुलकर्णी यांच्या कवितेचा प्रकृतिधर्मच असा आहे की,
स्वत:शीच हळुवारपणे गुणगुणल्यासारखीच ती व्यक्त होते.
या प्रकृतिधर्माशी सुसंगत अशी सूचकता त्यांच्या कवितेत
अगदी स्वाभाविकपणे आली आहे.

**- मंगेश पाडगावकर**

### दंवभिजली वही

हिमांशु कुलकर्णी

किंमत : ₹ १२०/- । (ट.ख. ₹ ५०)





अनिष्ट प्रथा, कर्मठता, शोषण,
अज्ञान अन् दारिद्र्य यांत
पिचत असलेल्या समाजाच्या
प्रगतीसाठी उमटलेला संवेदनशील सूर.

### अजान आणि चालिसा

मुबारक शेख

किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)

## राजहंसी विशेष

# अथक चालणे हाच मुक्काम : योगी चालता भला
# विनय हर्डीकर ७५!

*ज्येष्ठ पत्रकार, विचारवंत आणि 'राजहंस'च्या 'देवाचे लाडके' या पुस्तकाचे लेखक विनय हर्डीकर यांनी २४ जून २०२४ रोजी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली. त्या निमित्ताने त्यांचे मित्र व 'राजहंस'चे संपादक शिरीष सहस्त्रबुद्धे यांनी व्यक्त केलेले मनोगत...*

'माझ्या कॅमेऱ्याची लेन्सच वेगळी आहे रे! त्याला कोण काय करणार?' असं सन्मित्र विनय हर्डीकर पंचाहत्तरीचा उंबरठा ओलांडताना म्हणून जातो, तेव्हा त्याला जवळून ओळखणारे तरी 'सही फर्माया' असंच म्हणतील. कारण विनयशी बोलताना काहीतरी वेगळा दृष्टिकोन ऐकायला मिळणार आणि त्याच्या लिखाणातून तो वाचायला मिळणार, याची खात्री असते. निव्वळ हंशा आणि टाळ्यांसाठी चमकदार शेरे मारत नाही तो. विजेसारख्या सणकन चमकून उठणाऱ्या त्याच्या मतांमागे खास त्याचं असं एक ठाम लॉजिक असतं आणि ते तो पार्श्वभूमी-उदाहरणांसह मांडूही शकतो. त्याच्या या निराळ्या लेन्समुळेच, त्याला कधी अगदी साध्या विषयात मोठा आशय आढळतो, तर कधी इतरांच्या दृष्टीनं मोठाच असलेला विषय त्याला 'फुस्स्स' वाटतो.

आता हेच पहा ना : ७५ वर्षांच्या प्रदीर्घ आयुष्यात त्यानं खूप सारे मुक्काम गाठले आणि त्यातल्या बहुतांश कामात आपला असा ठसा उमटवला. पण चार-पाच वर्षांपेक्षा जास्त काळ तो कुठेच रमला नाही, टिकून राहिला नाही. कारण काय? तर 'टिकाऊपणा' हे खास मराठी मध्यमवर्गीय मूल्य त्याच्या मोजपट्टीप्रमाणे महत्त्वाचं नाहीच मुळी. पाच वर्षांपेक्षा जास्त काळ जिला चिकटून राहावं, अशी कोणतीही संघटना आणि असा कोणताही नेता त्याला आढळला नाही. जो प्रकल्प हातात घेतलेला असेल, त्याचं काम स्वत:ला त्यात पूर्णत: झोकून देऊन करायचं; असा त्याचा बाणा नेहमीच राहिला आहे. ते करताना तो स्वत:ला आणि प्रकल्प-प्रमुखालाही पारखत राहतो. ही गोष्ट, त्यानं तो प्रकल्प सोडल्यानंतरच प्रमुखासह अनेकांच्या लक्षात येते! त्याच्याच शब्दांत सांगायचं, तर 'पाच वर्षांपेक्षा जास्त काळ जिथे रमावं, अशी एकच संस्था मला सापडली : कुटुंबसंस्था!' (नशीबच म्हणायचं, एक तरी मिळाली!)

साप्ताहिक ‘माणूस’ आणि ‘राजहंस प्रकाशना’शी वयाच्या ऐन पंचविशीपासून लेखक म्हणून संबंधित असलेल्या विनय हर्डीकरच्या पंचाहत्तरीचा समारंभ नुकताच पुण्यात झाला. त्या वेळी घेतल्या गेलेल्या त्याच्या प्रकट मुलाखतीत, ‘आयुष्यात त्यानं काय काय केलं’ याची उजळणी होणं स्वाभाविकच होतं. ‘ज्ञानप्रबोधिनी’ या पुण्यातल्या ख्यातनाम प्रशालेत कार्यकर्ता-शिक्षक म्हणून त्यानं काम केलं, त्या वेळी संस्थापक अप्पासाहेब पेंडसे यांचा तो निकटवर्ती होता. त्याचे त्या वेळचे विद्यार्थी अजून त्याच्या प्रभावी शिकवण्याच्या आठवणी सांगतात. प्रबोधिनीचं पहिलं गीत विनयनं लिहिलं. (लहानपणापासून आजपर्यंत त्यानं किमान ९० कविता लिहिल्या असतील, पण अजून एकही कवितासंग्रह प्रकाशित झालेला नाही. ‘नव्वदाव्या वर्षी करू तो विचार!’ असं यावर त्याचं म्हणणं आहे!) प्रबोधिनीशी आणि अप्पांशी स्नेहसंबंध ठेवून त्यानं औपचारिक संबंध संपवले, त्या आसपास तो ‘माणूस’ साप्ताहिकाशी लेखक म्हणून जोडला गेला, तर दुसरीकडे पुणे विद्यापीठात पीएचडीसाठी संशोधन सुरू ठेवलं. संशोधनातून पीएचडी निष्पन्न झाली नाही, कारण पुन्हा वेगळा दृष्टिकोन! मात्र ‘माणूस’मधलं लेखन आणि आणीबाणीतला तुरुंगवास, यातून ‘जनांचा प्रवाहो चालिला।’ हे विनयचं पहिलं पुस्तक निष्पन्न झालं. राजहंस प्रकाशनानं १९७८मध्ये ते कौतुकानं प्रसिद्ध केलं आणि ते विलक्षण गाजलं. या पुस्तकामुळे विनयला विचारवंत आणि लेखक अशी दुहेरी ओळख मिळाली. तो काही काळ विनय श्री. श्रीभाऊ माजगावकरांच्या अगदी जवळचा होता.

सत्तरच्या दशकाअखेरीस भारतात झालेल्या विलक्षण राजकीय उलथापालथीनं विनयमधला पत्रकार जागा केला. या काळात ‘इंडियन एक्सप्रेस’ वृत्तपत्रात ‘रोव्हिंग करस्पॉन्डन्ट’ म्हणून त्यानं पूर्णवेळ नोकरी केली (१९८१-८६). त्या वेळचे एक्सप्रेसचे संपादक आणि ख्यातनाम लेखक-पत्रकार अरुण शौरी यांचा तो आवडता सहकारी



साहित्य (मराठी-हिंदी-इंग्रजी), राजकारण, समाजकारण, सामाजिक चळवळी-आंदोलने, शास्त्रीय संगीत अशा अनेकविध क्षेत्रांत मुशाफिरी करणाऱ्या एका विचारवंताने मान्यवरांविषयी लिहिलेल्या लेखांचा संग्रह.

देवाचे लाडके

विनय हर्डीकर

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

बनला. राष्ट्रीय पातळीवर फिरत राहून आपणच आपले विषय शोधायचे आणि घटनांमागचं सत्य उजेडात आणायचं, ही शोध-पत्रकारिता त्याला भावली. (अर्थात शोध-पत्रकरिता ही कालांतरानं 'प्रतिशोध-पत्रकारिता' व्हायला लागली, असं मत मांडायलाही तो कचरत नाही!) या काळात त्याचं लिखाण राष्ट्रीय पातळीवर नावाजलं गेलं. ''एक्सप्रेसमधली प्रतिष्ठेची नोकरी का सोडलीस?'' याचं उत्तरही विनय ''जिथे मी काम करत असतो, तिथली चौकट मात्र वाढत किंवा बदलत नाही. त्यामुळे मी तिच्या लांबी-रुंदी-उंचीत बसेनासा होतो उर्फ 'मिसफिट' ठरतो. कारण आपली वाढ तर होणारच, व्हायलाच हवी. पण व्यवस्थेला तिच्याशी काही देणंघेणं नसतं. अशा वेळी बाहेर पडणं, हाच प्रामाणिकपणाचा पर्याय असतो.'' असं देतो. तर मग विनय एस्टॅब्लिशमेंटपेक्षा स्वत:ला मोठा/श्रेष्ठ समजतो का? त्याचा तसा दावा नसतो. एका ठिकाणी स्वत:ला गाडून घेतल्यासारखं एकच काम कैक दशकं करत राहणाऱ्या व्यक्तींबद्दल त्याला आदरच वाटतो. तसंच काही एक व्यवस्था असणार, ही अपरिहार्यताही त्याला मान्य आहे; पण त्या व्यवस्थेत सामील होण्यासाठी आणि टिकून राहण्यासाठी तडजोडी कराव्यात, हे त्याला भावत नाही आणि जमतही नाही. त्याचा उपाय सोपा आहे. गरजा कमी ठेवायच्या, उंची राहणीमानाची महत्त्वाकांक्षा धरायची नाही; म्हणजे आर्थिक असुरक्षितता भेडसावत नाही. शिवाय कुठलीही व्यवस्था ही कायमस्वरूपी मानगुटीवर बसवून घ्यायची, हेही विनयला मान्य नाही. कारण व्यवस्थांचा कल, प्रवृत्ती मुख्यत: प्रागतिक, उदारमतवादी अशा नसतातच. त्या प्रत्येकाला दाबून टाकायला बघतात. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध दंड थोपटून नवी व्यवस्था आणायचा प्रयत्न करावाच लागतो, हा त्याचा आवडता विचार सोबतीला होताच.



*विनय हर्डीकर*

विनयच्या कारकिर्दीचा संपूर्ण आलेख इथे मांडायचा नाही. पण एवढं मात्र पाहायला मिळतं, की त्याच्या ब्रीदाला जागून त्यानं शेतकरी संघटनेत शरद जोशींचा कितवासा उजवा हात म्हणून पाच वर्षं झोकून देऊन काम केलं. प्रख्यात उदारमतवादी, समाजवादी व सेक्युलर विचारवंत डॉ. अ. भि. शहा यांचा साहाय्यक व पुढे त्यांच्या पश्चात 'न्यू क्वेस्ट' या नियतकालिकाचा संपादक म्हणून पाच वर्षं तळमळीनं कार्यरत राहिला. अर्थात तरीही 'संघीय विचारवंत' हा त्याच्यावरचा शिक्का पुरेसा पुसला गेला नाही, याची त्याला खंत वाटत असावी. त्याच्या मतानं तो खरा

लिबरल आणि सेक्युलर आहे. भारतीयांमध्ये तो 'हिंदू भारतीय' आणि 'मुस्लीम भारतीय' असा भेद मानत नाही. विनयचं वाचन व्यासंग म्हणावा इतक्या उंचीचं, चौफेर आणि कुंपणरहित आहे. त्याची स्मरणशक्ती भुताटकी वाटावी इतकी अद्‌भुत आहे. त्याच्या एकूण उपक्रमांची संख्या मोजण्यापलीकडे जाऊ शकेल, अशी आहे. २३ एप्रिलला त्याच्या आवडत्या शेक्सपियरचा जन्मदिन आणि मृत्युदिनही असतो. तो दिवस वेगवेगळ्या कार्यक्रमांनी साजरा करायचा उद्योग त्यानं अनेक वर्षं केला. पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागात २५ वर्षांहून जास्त काळ अभ्यागत प्राध्यापक म्हणून तो कमालीचा लोकप्रिय ठरला. 'मराठी कादंबरी' या विषयावर शिवाजी विद्यापीठात त्यानं दहा दिवसांचं एक सलग ज्ञानसत्र चालवलं. त्याच्यावर आधारित पुस्तक वर्षभरात येण्याची शक्यता आहे. संतसाहित्यावरही असं एक ज्ञानसत्र करायची त्याची तयारी आहे. (आयोजक हवेत आणि प्रायोजकही.) विद्वत्ता असली, तरी रुक्ष स्वभावाचं त्याला वावडं आहे. तो संगीतातला जाणकार रसिक आहे. मल्लिकार्जुन मन्सूर हे त्याचं एक दैवत. राजकीय पक्ष काढण्याची नसती उठाठेवही त्यानं करून पाहिली. राजकारणाबद्दल त्याला बहुधा एकाच वेळी ओढ आणि घृणा, दोन्ही वाटत असावं. एक माणूस एका आयुष्यात किती उपक्रम आणि कार्यक्रम करू शकतो, याचं उत्तम उदाहरण म्हणून त्याच्या आयुष्याकडे बोट दाखवता येईल.

पत्रकार आणि विचारवंत म्हणून प्रदीर्घ काळ वावरल्यानंतरही आपल्या नावावर फक्त आठच पुस्तकं जमा आहेत, याची त्याला खंत वाटत नाही. कारण संख्यात्मक वाढ हा तो श्रेष्ठत्वाचा निकष मानतच नाही. हे सगळे व्याप चांगल्या तऱ्हेनं सांभाळताना तो रीतसर कुटुंबवत्सल माणूस आहे आणि त्या आघाडीवर समाधानी आहे, याचं श्रेय पत्नीला जाहीरपणे द्यायला तो संकोचत नाही.

आतापर्यंतच्या या प्रदीर्घ कारकिर्दीत वेळोवेळी विनय अनेक मोठमोठ्या गुणवान, कर्तृत्ववान व्यक्तींच्या सहवासात आला. त्यांना त्यानं आपल्याकडचं काही दिलं आणि त्यांच्याकडून बरंच काही घेतलं. त्याच्या अशा मित्र-तत्त्वज्ञ-मार्गदर्शकांची संख्या खूप मोठी आहे. यातल्या अनेकांना 'विनय आपला वारसदार व्हावा / होईल' असं त्या त्या वेळी वाटलं आणि अर्थातच त्यांची निराशा झाली. कारण विनयच्या मेंदूत त्याची पंचवार्षिक योजना घट्ट बसलेली आहे. फडक्यांच्या कादंबऱ्यांतल्या सगळ्या ललनांनी मिळून जेवढ्या नायकांचे प्रेमभंग केले असतील, त्यांच्यापेक्षाही विनयनं केलेल्या त्याच्या मेंटॉर्सच्या मनोभंगांची संख्या जास्त भरेल! विनयला त्याच्या इच्छेनुसार सक्रिय दीर्घायुष्य लाभो आणि त्याचे आत्ता मनात असतील ते आणि नंतरही मनात येतील ते संकल्प सुफल संपूर्ण होवोत, ही मैत्रीपूर्ण शुभेच्छा.

***शिरीष सहस्रबुद्धे***

# राजहंसी ग्रंथसृष्टी

## द सीक्रेट मिशन

*भालेवाडी ह्या छोट्या वस्तीच्या निसर्गरम्य खेडेगावात*
*सातत्यानं घडतायत काही गैरप्रकार आणि अपहरणाच्या घटना!*
*अनेक व्यक्ती गायब झालेल्या. कुणाचाही तपास तर लागत नाहीच,*
*पण मृतदेहसुद्धा हाती लागलेले नसतात. या रहस्याचा छडा लावण्यासाठी*
*पोलीस डिपार्टमेंटकडून एका खास इन्स्पेक्टरची विशेष नियुक्ती केली जाते.*
*इथून सुरुवात होते 'द सीक्रेट मिशन' ह्या रहस्यमय कादंबरीची...*

इन्स्पेक्टर धनेश खूप उमदा, डॅशिंग, उंचापुरा, तडफदार व्यक्तिमत्त्वाचा तरुण. आणि विशेष म्हणजे 'आजवर हातात आलेल्या सर्व केसेस यशस्वीरीत्या सोडविण्यासाठी प्रसिद्ध' असा नावलौकिक पोलीस वर्तुळात असलेला इन्स्पेक्टर. गावात येऊन दाखल होताक्षणी तो तिथल्या पोलीस स्टेशनचा ताबा घेतो. आधीच्या सर्व धूळ खात पडलेल्या फायली काढायची ऑर्डर ठाणे अंमलदार श्री. मांडकेंना देतो. सबइन्स्पेक्टर मांडके नुकतेच एक-दीड वर्षांपूर्वी रुजू झालेले. पण त्यांना ह्या केसेसचा शोध घेण्यात फारसा रस नाही. अचानक आपल्याला ऑर्डर सोडणारा कोणीतरी डोक्यावर येऊन बसलाय, हे काही त्यांच्या पचनी पडत नाही.

मांडकेंचा एकंदर आविर्भाव बघून धनेशच्या लक्षात येतं, की इथे ह्यांच्या सान्निध्यात राहून आपलं मिशन फत्ते करणं अवघड आहे. तरीही तो हेडकॉन्स्टेबल जगदाळेंना हाताशी घेऊन मिशनची सुरुवात करतो. काम तसं जिकिरीचंच. कारण धनेशच्या प्रत्येक हालचालीवर मांडकेंचं बारीक लक्ष. हे जाणून एक किचकट काम धनेश त्यांच्यावरच सोपवतो. आत्तापर्यंत जितके लोक मिसिंग झाले, त्यांच्या घरच्यांना भेटून गायब व्यक्तीची माहिती मिळवणं. मांडके पाटी टाकल्यागत सगळ्या लोकांना भेटतात. परंतु हाती काही ठोस लागत नाही. धनेश थोडा निराश होतो आणि पुन्हा एकदा स्वत:च तपासकार्य सुरू करतो.

हे सगळं कमी म्हणून की काय, आणखी एका नवीन मिसिंग केसची तक्रार नोंदवायला जुम्मन पोलीस स्टेशनमध्ये येतो. पण त्याची तक्रार कुणीच नोंदवून घेत नाही. धनेशनं चौकशी केल्यावर कॉन्स्टेबल कदमकडून त्याला इतकं हलगर्जीपणाचं

उत्तर मिळतं की त्याचं पित्त खवळतं. तो स्वत: जुम्मनची केस नोंदवायला कदमला भाग पाडतो. चॉकलेट हीरोसारख्या दिसणाऱ्या, नेहमी सगळ्यांशी गोड बोलून संवाद साधणाऱ्या धनेशची अचानक जेव्हा सटकते, तेव्हा त्याचा तो रुद्रावतार बघून कदमसहित सगळ्यांचीच टरकते...

◆◆◆

धनेशच्या प्रतिष्ठेला शोभेल असं लॉज गावात नसतंच. त्यामुळे पन्नाशीच्या आतबाहेर असलेले, अतिशय विश्वासू, कामासाठी तत्पर आणि गावातली खडान्‌खडा माहिती असलेले, प्रामाणिक सहकारी हेडकॉन्स्टेबल जगदाळे धनेशला आपल्या घरीच राहायची विनंती करतात. धनेशही तयार होतो आणि इथेच एन्ट्री होते या कथेच्या नायिकेची अर्थात दुर्वाची.

दुर्वा ही जगदाळेंची एकुलती एक, हुशार, देखणी लेक. ती कॉलेजमध्ये शिकतेय आणि त्याचबरोबर सिव्हिल सर्व्हिसेस परीक्षेसाठीही तयारी करतेय. तिला बघताच धनेशची विकेट उडते. 'भालेवाडीच्या चिखलात हे सुंदर कमळ कुठून फुललं बरं?' ही असते त्याची पहिली प्रतिक्रिया..!

◆◆◆

जुम्मनची बेपत्ता बहीण सईदाचं शोध-तपासकार्य अजून चालूच असतं, तोवर आणखी कोणती बरं चमत्कारिक घटना घडते?

पण त्याआधी थोडं मागे जाऊन गावाची एक पार्श्वभूमी पाहू या.

◆◆◆

धनेश गावचा फेरफटका मारायला जगदाळेंसमवेत निघतो. अतिशय पुरातन वास्तुशिल्पकलेचा उत्तम नमुना अशी ख्याती असलेल्या एका शिवमंदिरात पोहोचतो. मंदिराविषयी गावात विविध समजुती, अफवा पसरलेल्या असतात. त्यामुळेच स्थानिक




१६९५मध्ये औरंगजेबाच्या एका जहाजावर पडलेल्या दरोड्याचा शोध घेण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग केला जातो. ही सांगड घालताना निर्माण होणारे प्रश्न आणि निघणारे निष्कर्ष खरे असतील का? किंवा खरेच निघाले तर...?

**१६९५ : स्मार्ट रोबो, एआय आणि औरंगजेब...!**

सुरेश वांदिले

किंमत : ₹ २४०/- । (ट.ख. ₹ ५०)

गावकरी दर्शनासाठी जायची हिंमतच करत नाहीत. कुणालाही गाभाऱ्यात प्रवेशाला मनाई आहे. फक्त बाहेरच्या जाळीच्या दरवाजातून दर्शन घेता येतं. दरमहा एक दिवस तर मंदिर पूर्णपणे बंद ठेवलं जातं. तसंच तिथे जल/दूध अभिषेकपण वर्ज्य आहे. या सगळ्या समजुती धनेशला थोड्या चमत्कारिक वाटतात. कुतूहल म्हणून तो दुसऱ्या दिवशी त्या मंदिराच्या पुजाऱ्याला गाठायचं ठरवतो. मंदिराबद्दल त्याला काही वेगळी माहिती असेल तर जाणून घेणं, हा त्यामागचा उद्देश. पुजारी अगदी ऐंशी पार केलेला तुकतुकीत म्हातारा. आपल्या गोड वाणीनं पुजाऱ्याचं मन जिंकून धनेश गर्भगृह दर्शनाची परवानगी मिळवतो. पुजाऱ्याच्या अटींचं तंतोतंत पालन करत, पिंडीला स्पर्श न करता आणि गाभाऱ्यात प्रवेशाची परवानगी दिली हे गुपित राखून आता धनेश आणि जगदाळे रोजच दर्शनाला येत असतात. महिन्यातून एक दिवस ह्या मंदिराचा छोटा दरवाजाही बंद राहतो, त्यामुळे त्या दिवशी कुणालाच दर्शन घेता येत नाही. ही गोष्ट पुजाऱ्याकडून कळल्यावर अशाच एका मध्यरात्री बारा वाजता कुणाला न सांगता धनेश एकटाच मंदिराकडे जायला निघतो. काही अंतर पार केल्यावर एका गल्लीच्या तोंडाशी त्याला काळाकभिन्न माणूस पाठीवर पोतं घेऊन घाईघाईनं जाताना दिसतो. तो प्रदेश डोंगराळ, तेव्हा कबील वस्तीचे लोक तिथे राहत असत. हा त्यांपैकीच एक असला, तरी इतक्या रात्री हा पाठीवर पोतं घेऊन कुठे चालला ही उत्सुकता आणि पोलिसी डोक्यात वळवळणारा संशयी किडा धनेशला शांत बसू देत नाही. तो हलक्या पावलांनी त्याचा पाठलाग करतो. अंतर थोडं कमी झाल्यावर त्याला पोत्यात हालचाल जाणवते. जणू एखादं जनावर त्यात बांधून नेलं जावं तशी. थोडं अजून जवळ गेल्यावर 'वाचवा, वाचवा' असा एक अस्फुट आवाज येऊ लागला, तसे धनेशचे कान टवकारले आणि त्यानं पूर्ण ताकदीनिशी मागून झडप घालून ते पोतं खाली पाडलं. अचानक झालेल्या हल्ल्यानं तो मनुष्यपण बिथरला. त्यांच्यात झालेल्या झटापटीत

पंचक्रोशीतला वतनदारांचा वाडा. वैभवशाली, सालंकृत लक्ष्मीसारखा देखणा... वाड्यात अधूनमधून दिसणारा मूळपुरुष नाग... आणि घरातल्या कर्त्या, सवाष्ण स्त्रियांना अल्पायुष्याचा शाप... काळाच्या कुपीत दडलेली रहस्यं उलगडत जाणारी कादंबरी.




सवाष्ण

डॉ. क्षमा गोवर्धने शेलार

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ५०)

तो मनुष्य पोतं तिथंच टाकून पळाला, तरी त्याच्या तीक्ष्ण हत्याराचा वार धनेशच्या खांद्यावर जखम करून जातो. पोतं उघडून बघतो, तर त्यात एक सुंदर तरुणी! तिचं अपहरण होता होता वाचते... ही मुलगी कोण?

अर्थात ती असते दुर्वाच! आजच मंदिर बंद आणि आजच दुर्वाचं अपहरण होत होतं? ह्या दोन घटनांचा आपसांत काही संबंध असेल का? की दुर्वाऐवजी त्यांचं टारगेट स्वत: धनेशच असेल? आणि चुकून दुर्वा त्यांच्या हातात सापडली? धनेशच्या जखमेवर झाडपाल्याच्या औषधींचा हुकमी उपाय दुर्वाच करते का?

उत्कंठा लावणाऱ्या ह्या प्रश्नांची उकल 'द सीक्रेट मिशन' ही कादंबरी वाचल्यास नक्की होईल.

◆◆◆

गावात पूर्वी झालेल्या अपहरणाच्या घटनांमध्ये समावेश असतो आणखी एका महत्त्वाच्या व्यक्तीचा. गायब झालेल्या व्यक्तींच्या तपासासाठी प्रामाणिकपणे परिश्रम करणारे त्या वेळचे सबइन्स्पेक्टर सावंत यांचंही अपहरण झालेलं असतं आणि तेही गायबच असतात. सावंतांचं कुटुंब, म्हणजे बायको आणि मुलगा तालुक्याच्या ठिकाणी राहतात. धनेश त्या फाईलवर आपलं लक्ष केंद्रित करून त्यांच्या पत्नीकडे सावंतांबद्दल सखोल, सूक्ष्म चौकशी करतो. इतक्या वर्षांत कोणीही न विचारलेले अनेक प्रश्न धनेश श्रीमती सावंतांना विचारतो. त्यांच्या घरातल्या भिंतीवर लावलेल्या काही फोटोंवर धनेशची नजर पडते आणि तो आपल्या मोबाईलमध्ये त्यांचे फोटो घेतो.

त्या फोटोत त्याला असं काय बरं दिसलं? श्रीमती सावंतांकडून त्याला कोणती विशेष माहिती मिळाली? धनेशला त्याचे खबरी आणि दुर्वा यांच्याकडून काय खास बातमी मिळते? त्याच्याकडे असलेल्या पेनमधल्या स्पाय कॅमेऱ्याचाही तो उपयोग करतो का? त्यातून काय उलगडा होतो?

वाचा 'द सीक्रेट मिशन'मध्ये...

◆◆◆

दरम्यान धनेशला सतत असं जाणवतंय, की कुणीतरी त्याच्या पाळतीवर आहे. त्याच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवून आहे कुणीतरी. तरीही तो आपल्या तपासावर लक्ष केंद्रित करतो. जुम्मनची बहीण जिथं गायब झाली, त्या ओढ्याजवळच तिची पाण्याला नेलेली घागर आणि ओढणीचा फाटका तुकडा सापडतो. तपासात तिथला परिसर पिंजून काढताना तिथे सापडतो एक छुपा जुना दगडी पाइप. त्यातून एक ताजा पांढरट द्रव वाहून आलेला दिसतो. धनेश त्याचे नमुने घेऊन शहरातल्या लॅबमध्ये तपासणीसाठी पाठवतो. आठवड्याभराने त्याचा जो रिपोर्ट येतो, तो वाचून धनेश थक्क होतो. तो सगळा परिसर म्हणजे गावाबाहेरच्या शिवमंदिराच्या भोवतीचा परिसर. गेली कित्येक वर्षं मंदिरात कोणत्याही द्रवपदार्थाचा अभिषेक वर्ज्य आहे. तेव्हा हा इतका ताजा द्रव त्या पाइपात कुठून आला? कोणतं द्रव्य आहे ते? आणि जर तो

पाइप मंदिरातच कुठेतरी सुरू होत असेल, तर मग तिथे अभिषेक तर होत असणार. तो करणारा कोण? आणि मग बाकीच्यांना मनाई का?

ह्या सगळ्या गूढांच्या निरगाठी धनेश कशा सोडवतो?

सबइन्स्पेक्टर सावंत जिवंत असतात का? त्यांना शोधण्यात धनेश यशस्वी होतो का? त्यांच्या अपहरणाची काय कहाणी आहे?

सईदाला शोधण्यात धनेश यशस्वी होतो का आणि कसा?

आणि सगळ्यात महत्त्वाचं : ह्या सगळ्या मिशनमध्ये आणखी एक सीक्रेट मिशन धनेशच्या वैयक्तिक आयुष्यात साइड बाय साइड घडत असतं! ते म्हणजे 'दुर्वा प्रकरण'! त्यात त्याला किती यश मिळतं?

◆◆◆

धनेशवर पाळत ठेवणारा बुरखाधारी लागतो का हाती? कसा? त्याच्या रहस्याचा उलगडा कसा होतो? धनेश खरोखरीच त्याचा एन्काउंटर करतो का? का करतो?

या सगळ्या गुन्ह्यांच्या मालिकेचा सूत्रधार कोण असतो? त्याच्यापर्यंत इन्स्पेक्टर धनेश कसा माग काढत पोचतो? क्लायमॅक्समध्ये नेमका त्याला कसा रंगेहाथ, भक्कम पुराव्यासह पकडतो? त्यासाठी दुर्वाची मदत बहुमोल ठरते का?

इन्स्पेक्टर धनेशला वेढून टाकलं होतं डझनावारी प्रश्नांनी...

◆◆◆

ह्या सगळ्या गूढांची गुंतागुंत सोडवताना येणारे धक्कादायक, थरारक अनुभव वाचण्यासाठी 'द सीक्रेट मिशन' ही कादंबरी सगळ्यांनी आवर्जून वाचायलाच हवी...

❖


नव्याने रुजू झालेला तरुण, तडफदार इन्स्पेक्टर धनेश...
गावातील प्राचीन शिवमंदिर नि
त्याविषयीच्या आख्यायिका...
एकामागोमाग एक घडणाऱ्या रहस्यमय घटना...
धनेश त्याच्या गुप्त 'मिशन'मध्ये यशस्वी होणार का?

द सीक्रेट मिशन

राधिका कुलकर्णी

किंमत : ₹ २६०/- । (ट.ख. ₹ ५०)



## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




बाईच्या संघर्षमय जगण्याचं चित्रण मराठी कादंबरीला नवं नाही. पण बायकांचा समूह मात्र क्वचितच कोणी रंगवला... एका लहानशा खेड्यातला बायकांचा समूह ओघवत्या भाषेत नि चित्रमय शैलीत रंगवणारी कादंबरी...

### बाय गं... सामान्य स्त्रीचे सामान्य जनजीवन

विद्या पोळ - जगताप

किंमत : ₹ ४८०/- । (ट.ख. ₹ ५०)

मुलीचं लग्न होतं, तेव्हा तिचं जीवन समूळ बदलतं; हे सर्वमान्य! पण ती एकटीनं, स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेते, तेव्हा? तिचं जीवन कसं बदलतं? काय होतं? स्वत:च्या निर्णयानं, स्वतंत्रपणे, एकल राहणाऱ्या स्त्रीचं आत्मकथन.




### विवाह नाकारताना

विनया खडपेकर

किंमत : ₹ ४३०/- । (ट.ख. ₹ ५०)




निसर्गातील अनपेक्षित साक्षात्कार, मानवी स्वभावातील अतर्क्य भावनाट्य किंवा जीवनाच्या एखाद्या प्राणसूत्राचं स्वत:ला नि:संदर्भ होऊन करून केलेलं आत्मचिंतन. एखाद्या संवेदनशील स्त्रीनं आपल्या जाणत्या सखीला कधी मनोगत तर कधी हृद्गत सांगावं, तसा आशय सांगणारा लेखसंग्रह...

### गोंदणखुणा

डॉ. प्रिया निघोजकर

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)




# गाऊ त्यांना आरती

'भारतरत्न' हा सर्वोच्च
नागरी सन्मान मिळवलेल्या
कर्तृत्ववंतांची 'राजहंसी' चरित्रे

## जेआरडी - मी पाहिलेले

*जे. आर. डी. टाटा यांना १९९२ साली 'भारतरत्न' या सर्वोच्च नागरिक सन्मानाने गौरवण्यात आले. 'जेआरडी - मी पाहिलेले' हे डॉ. द. रा. पेंडसे लिखित आणि भालचंद्र जोशी व शिरीष सहस्रबुद्धे अनुवादित पुस्तक 'राजहंस'ने प्रकाशित केले आहे. त्यातील 'जेआरडींची कार्यशैली' या प्रकरणातील हा संपादित अंश.*

**उत्तम आरोग्याचं रहस्य**

वयाचा विचार केला, तर जेआरडींची तब्येत खूपच चांगली होती. तुलनेनं सुमंत मूळगावकरांना मात्र उत्तम आरोग्याचं वरदान लाभलेलं नव्हतं. तसं म्हटलं तर जेआरडींप्रमाणेच एसेमच्या ठायीही आरोग्यकारक अशाच सवयी होत्या. एसेम संध्याकाळी सहानंतर कार्यालयात क्वचितच थांबायचे. याउलट जेआरडी सात वाजण्याअगोदर ऑफीसबाहेर पडले, असं क्वचितच होत असे. तरीही एसेम वारंवार आजारी पडायचे. एकदा जेआरडींशी मी चर्चा करीत असताना एसेमच्या नाजूक प्रकृतीचा विषय निघाला. वेळ होती दुपारी १.२०ची आणि जेआरडी उठून जेवायला निघाले होते.

मी म्हटलं, ''सर, टच वुड, तुमचं आरोग्य कौतुक करण्यासारखंच आहे. तसंच एसेमना का बरं लाभत नाही हे कळत नाही. त्यांच्या सवयीही तुमच्याइतक्याच व्यवस्थित नि आरोग्याला पोषक आहेत.''

जेआरडी व मी एव्हाना त्यांच्या खोलीच्या दाराजवळ पोहोचलो होतो आणि दार उघडण्यासाठी त्यांनी दाराच्या मुठीला हात घातला होता. थबकून ते माझ्याकडे वळले आणि म्हणाले, ''असं आहे पेंडसे, या डोअरनॉबकडे पहा. तो नीट काम करत नसेल तर मी रागावेन, संबंधित व्यक्तीला बोलावून तक्रार करीन. एखाद्या विमानप्रवासात किंवा रेस्टॉरंटमध्ये दिलेले खाद्यपदार्थ समाधानकारक वाटले नाहीत, तरीही मी हेच

करीन. पण या तक्रारी किंवा काळज्या मी घरी घेऊन जाणार नाही. त्या मी इथेच सोडून जाईन. याच पद्धतीनं मी काळजीमुक्त राहतो आणि कंपन्यांच्या कारभाराचा ताण स्वत:वर येऊ देत नाही. सुमंत मात्र 'टेल्को'मधल्या प्रत्येक गोष्टीची काळजी सदैव बरोबर घेऊनच वावरतो. हे चांगलं नाही. त्यामुळेच त्याची तब्येत बिघडते. मी त्याला हे सांगितलंही आहे. असो, चल, आता जेवायला जाऊ या.''

**जमशेटजींची प्रेरणा**

आपल्याला अनेकदा एकाकी वाटतं, हे माझ्याबरोबरच्या संभाषणात जेआरडी बऱ्याच वेळा बोलून दाखवायचे. एखादी समस्या हाताळताना आपले विचार ज्याला बोलून दाखवावेत, असं कुणीच आसपास नसे. अशा प्रसंगी त्यांना हटकून जमशेटजी टाटांची आठवण यायची. त्यांच्याबद्दल जेआरडींना विलक्षण आदर वाटायचा. अशा प्रसंगी जमशेटजींनी काय केलं असतं, याची अटकळ बांधण्यासाठी मग त्यांच्या डायऱ्या व इतर टिपणं जेआरडी पुन:पुन्हा वाचत. त्यानंतरच ते निर्णय पक्का करीत. जमशेटजींनी कोणता निर्णय घेतला असता, याचा अंदाज घेऊन जेआरडींनी घेतलेला निर्णय बहुतेक वेळा योग्य ठरत असे.

**भागधारकांशी सुसंवाद**

आपल्या शेकडो, हजारो भागधारकांशी जेआरडींचा उत्तम सुखसंवाद होत असे, तो मुख्यत: कंपन्यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभांच्या प्रसंगी. जेआरडी अध्यक्षस्थानी असत. भागधारक मोठ्या संख्येनं हजेरी लावीत. एसेमची स्थिती मात्र जेआरडींच्या




सचोटीच्या, विश्वासाच्या भक्कम पायावर उभी राहिलेली,
सव्वाशे वर्षांची मूल्याधिष्ठित परंपरा लाभलेली,
पाच पिढ्यांनी परिश्रमपूर्वक जोपासलेली भारताची निरलस
उद्यमशीलता म्हणजे टाटासंस्कृती.
जमशेटजी-दोराबजींपासून जेआरडी-रतन टाटांपर्यंत
साऱ्यांच्या कर्तबगारीनं सतत चढतं राहिलेलं
उद्योगतोरण म्हणजेच टाटायन!'

टाटायन : एक पोलादी उद्यमगाथा

गिरीश कुबेर

सतरावी आवृत्ती । किंमत : ₹ ५५०/- । (ट.ख. ₹ ५०)

उलट असे. ते ‘टेल्को’च्या वार्षिक सभेमध्ये काहीसे अस्वस्थचित्त दिसत. जेआरडी अध्यक्षस्थानी असलेल्या अशा कित्येक सभांना मी उपस्थित होतो आणि हा फरक अनुभवला. उपस्थित सर्व भागधारकांसाठी कंपनीच्या वतीनं खाद्यपदार्थ व चहा मागवला जाई आणि त्याचं आकर्षण खूपच मोठं असे. बैठक सुरू होऊन अर्धा तास झाला, की जेआरडी थोड्या गमतीनं जाहीर करीत, की खाद्य-पेयं कॅफेटेरियामध्ये दिली जाताहेत आणि ती घेतल्यानंतर सभागृहात परत यायची सक्ती बिलकूल नाही.

भागधारकांना विचार व्यक्त करायची मोकळीक दिली जाई. अशा प्रत्येक वक्त्याचा फोटो काढून कंपनीतर्फे मागाहून घरपोच भेट पाठवला जाई. जुन्या कर्मचाऱ्यांपैकी काहींचं म्हणणं तर असं होतं, की निव्वळ स्वत:चा फोटो फुकट काढून घेण्याची संधी म्हणून काही भागधारक बोलायला उभे राहत. बहुतेक वक्ते कंपनीची कामगिरी आणि विशेषत: जेआरडींचं नेतृत्व, यांची तोंड भरून प्रशंसा करीत. एकदा तर इतके वक्ते स्तुती करू लागले, की मध्येच हस्तक्षेप करीत जेआरडी म्हणाले, ‘‘स्तुतीच्या या वर्षावानं मी धन्य झालो. तुम्ही इतकी प्रशंसा करणार आहात हे मला आगाऊच सांगितलं असतंत, तर मी निदान माझ्या पत्नीला तरी बोलावलं असतं. तिलाही या निमित्तानं कळलं असतं, केवढा थोर माणूस आपल्याला नवरा म्हणून लाभलाय ते.’’

एका प्रसंगी एका कंपनीची ही सभा काही कारणानं ताजमहाल हॉटेलात भरवली होती. ताजच्या चवदार पदार्थांचा आस्वाद घेण्याची ही नामी संधी भागधारकांना मिळाली. भरगच्च उपस्थिती असलेली ही बैठक भलतीच लांबत चालली. बरेच वक्ते कंपनीच्या कामगिरीतल्या काही मुद्द्यांवर टीकास्त्र सोडतानाच, दुसरीकडे जेआरडींची तारीफ करीत होते. चार वाजता सुरू झालेली बैठक साडेसात वाजले, तरी संपण्याचं चिन्ह दिसेना. शेवटी जेआरडी गमतीनं म्हणाले, ‘‘भागधारकांसाठी आज रात्रीच्या जेवणाची काही सोय इथं केलेली नाही, हे मुद्दाम सांगायलाच हवं. हे हॉटेल फार तर मला रात्रीच्या मुक्कामासाठी एखादी खोली देईल; पण तुमच्यापैकी काहींना मात्र रात्री घरी परतायला फारच उशीर झाला, तर बायकोची बोलणी खायला लागतील.’’

एसेमना ‘टेल्को’मधली खडान्‌खडा माहिती असे. पण ‘नर्व्हस’ स्वभावामुळे ते भागधारकांच्या प्रश्नांना तोंड द्यायची कामगिरी नानी पालखीवाला किंवा तळावलीकर यांच्यावर सोपवीत. जेआरडी मात्र स्वत: सर्व विषयांतले माहीतगार




आ. सातवी । किंमत : ₹ २४०/- । (टपाल ₹ ५०)

नसल्यानं, भागधारकांनी दैनंदिन कारभाराविषयी फार खोलात जाऊन प्रश्न विचारला वा भाष्य केलं, तर ते मागे बसलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वळून त्यांचा अभिप्राय विचारीत आणि मगच उत्तर देत.

**सहकारी संचालकांसोबतच्या स्वतंत्र बैठका**

'टाटा सन्स'च्या संचालकांना, विशेषत: मोठ्या कंपन्यांचं नेतृत्व करणाऱ्यांना नियमितपणे भेटण्याचा जेआरडींचा रिवाज होता. दर आठवड्याला प्रत्येकासाठी ठरावीक वेळी अर्धा तास राखून ठेवलेला असे. क्वचित असं व्हायचं, की चर्चेला विशेष महत्त्वाचा विषय नसायचा किंवा जेआरडींना वा त्या संचालकांना अपरिहार्य असं दुसरं काम असायचं. अशा प्रसंगी बैठक पुढे ढकलली जायची अथवा रद्द व्हायची. अर्थात तातडीचं काम असेल, तर पूर्वसूचनेशिवायही थेट जेआरडींच्या खोलीत घुसायची मुभा 'टाटा सन्स'च्या सर्व संचालकांना होतीच.

माझ्या अंदाजानं या साप्ताहिक बैठकांत त्या संचालकाच्या अखत्यारीतील कंपन्यांचं कामकाज चर्चेला येत नसणार, किंवा साप्ताहिक प्रगती अहवाल असाही काही सहसा मागितला-दिला जात नसणार. जेआरडींनी एकदा मला सांगितलं होतं, ''ते सगळे अधिकारी समर्थ आहेत आणि कंपन्या उत्तम चालवतात. त्यांनीच एखादा कंपनीविषयी विषय उपस्थित केला तर गोष्ट वेगळी. एरवी मी त्यांना सल्ला द्यायचा वा प्रश्न विचारायची गरज नसते.'' माझ्या मते, या बैठकांचा उपयोग जेआरडी त्या संचालकांच्या मनात डोकावण्यासाठी करून घ्यायचे. कुठे दोन संचालकांत तणावाचा वास लागला, तर ती समस्या मुळातून निपटण्यासाठी ते कृती करायचे.

अशा बैठका रद्द झाल्या, तर त्यालाही काही तरी महत्त्व असायचं. एकदा मी जेआरडींबरोबर होतो. काही वेळानंतर त्यांच्याशी 'टाटा सन्स'च्या एका संचालकांची




अनेक प्रकारे उपयुक्त ठरणारी वीज सामान्य माणसाच्या दैनंदिन आयुष्यात खेळवणाऱ्या, आपले अवघे आयुष्य विद्युतविज्ञानात झोकून देणाऱ्या - मनस्वी वैज्ञानिकाच्या विलक्षण आयुष्याचा वेध!

निकोला टेस्ला

रोजच्या आयुष्यात वीज खेळवणारा वैज्ञानिक

सुधीर फाकटकर

किंमत : ₹ २७०/- । (ट.ख. ₹ ५०)

बैठक ठरलेली होती. ठरल्या वेळेपूर्वी पंधरा मिनिटं त्या संचालकांनी जेआरडींना दूरध्वनी केला. चर्चेसाठी फार महत्त्वाचा असा मुद्दा नसल्यामुळे, आत्ताऐवजी पुढच्या आठवड्यात भेटावं असा त्यांचा प्रस्ताव होता. जेआरडींनी अर्थातच त्याला संमती दिली, पण काहीसा प्रश्नार्थक चेहरा करून ते स्वत:शीच पुटपुटले, ''यांच्याशी बैठक हुकण्याची ही लागोपाठ दुसरी वेळ.'' कुठेतरी काहीतरी चुकतंय अन् ते दुरुस्त करायला हवं, असाच त्यांच्या या बोलण्याचा रोख होता.

हेच तंत्र काही वेळा जेआरडीही वापरीत. एकदा त्यांनी मला चर्चेसाठी बोलावलं. मला मुद्दा तातडीचा असा वाटला नाही. दरम्यान एका संचालकांबरोबरच्या ठरलेल्या चर्चेची वेळ झाली, तेव्हा जेआरडींनी त्यांच्या तत्कालीन कार्यकारी साहाय्यक श्रीमती हॉगुडना सांगितलं, ''त्यांना निरोप द्या, की पेंडसे यांच्याबरोबर चर्चेत साहेब व्यग्र आहेत. तातडीचा काही विषय नसला, तर बैठक पुढच्या आठवड्यापर्यंत पुढे ढकलू या.'' जेआरडींकडून आलेला असा एखादा संदेशही खूप काही सुचवून जात असे.

**सहकारी? नव्हे, विश्वासू मित्रच!**

अनेक ज्येष्ठ सहकाऱ्यांसमवेत जेआरडींचे जे विश्वासाचे व मैत्रीचे संबंध निर्माण झाले होते, त्यांना जेआरडी सर्वोच्च महत्त्व देत. त्यातही सुमंत मूळगावकर यांच्या व जेआरडींच्या नातेसंबंधाला मी तरी सर्वश्रेष्ठ मानतो. ते दोघेही एकमेकांचा आदर करीत आणि परस्परातल्या मैत्रीच्या जपणुकीला इतर कोणत्याही संबंधापेक्षा जास्त मोलाची मानीत. क्वचित काही तात्पुरते गैरसमज झाले, तर ते मिटवण्यासाठी माफी मागायलाही जेआरडी कमी करीत नसत. मला अशा काही गोष्टी माहीत आहेत. त्यांतली उदाहरणादाखल एकच सांगतो. एका साप्ताहिक बैठकीत टिस्कोमधल्या काही घडामोडींबद्दल मूळगावकरांनी काही प्रतिकूल अभिप्राय व्यक्त केला. जेआरडींचं मत

'इंजिनीयरिंग मार्व्हल' म्हणजे आयफेल टॉवर.
तो साकारणाऱ्या प्रतिभावान अभियंत्याचे
अनेक चढउतारांनी भरलेले, यशोमालिकांनी रंगलेले
अन् लोकापवादांनी माखलेले आयुष्य
चितारणारे चरित्र!




आयफेल

सत्यजीत साळवे

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

त्याच्या बरोबर उलट होतं. ‘टिस्को’च्या त्या प्रस्तावाला स्वत: जेआरडींचा पाठिंबा होता. मूळगावकर अन्याय्य भूमिका घेताहेत असं जेआरडींना वाटलं. तसं त्यांनी बोलूनही दाखवलं. कदाचित दोघांमध्ये थोडी बोलाचालीही झाली असावी. नंतर एकदा मी एसेमना भेटलो, तेव्हा एसेमनी त्याच प्रतिकूल अभिप्रायाचा पुनरुच्चार केला. ते अजूनच खचलेले असे वाटले. ‘‘काय उपयोग? जे समजूनच घेत नाहीत.’’ एसेम म्हणाले.

आणखी एका पंधरवड्यानंतर एसेमशी दुसरी काही चर्चा झाल्यानंतर, मी या विषयाबद्दल थोडी उत्सुकता दाखवली. एसेम मोकळेपणानं म्हणाले, ‘‘ते मागाहून इथं आले होते. आमच्या गप्पाही झाल्या. परत गेल्यावर त्यांनी मला त्यांच्या हस्ताक्षरात छानसं पत्र लिहिलं आणि जे काही घडलं होतं त्याबद्दल कळकळीची दिलगिरी व्यक्त केली. आता ते प्रकरण संपलंय.’’ एसेम हे सांगताना निवांत, तणावमुक्त आणि हसरे दिसत होते. मला सानंद आश्चर्य वाटलं. पण खरं तर आश्चर्य वाटायचं कारण नव्हतं. जेआरडी आणि एसेम साधे सहकारी नसून जिवलग मित्र झाले होते.

झालं गेलं विसरून कामाला लागणं, यावर दोघांचाही विश्वास होता. जेआरडींचं ते दिलगिरीचं पत्र म्हणजे एक अनमोल रत्न आहे. या पुस्तकात ते मूळ रूपात उद्धृत केलं आहे.

**डायरेक्टर्सचा क्लब**

टाटा समूहात वेगवेगळ्या पातळ्यांवर जेआरडींच्या आवडत्या व्यक्ती होत्या, पण तरीही ‘डायरेक्टर्स क्लब’चं एक अलिखित वेगळेपण होतंच. त्यात स्थान होतं ते फक्त ‘टाटा सन्स’ आणि ‘टाटा इंडस्ट्रिज’च्या संचालकांनाच. ह्याबाबत जेआरडी तडजोड करीत नसत. याचं एक उदाहरण म्हणजे दिल्लीतला ‘टाटा बंगला’. फक्त डायरेक्टर्स



नोकरी मागणारा नव्हे,
तर अनेकांना नोकरी देणारा
तरुण उद्योजक. विकासाचा वसा घेतलेल्या
हणमंतराव गायकवाडांची अन्
‘भारत विकास ग्रुप’ची कहाणी!

असाही एक किमयागार

अंजली ठाकूर

किंमत : ₹ २७५/- । (ट.ख. ₹ ५०)

क्लबच्या सदस्यांनाच, दिल्लीला गेल्यावर टाटा बंगल्यात मुक्काम करता येत असे. गंमत म्हणजे बऱ्याच टाटा कंपन्यांची दिल्लीत स्वत:ची अतिथिगृहं होती आणि त्यांचे अध्यक्ष डायरेक्टर्स क्लबचे सदस्य असले, तरी टाटा बंगल्यावर उतरण्याऐवजी स्वत:च्या अतिथिगृहात राहत. साहजिक टाटा बंगल्यात रहिवासी कमीच असत. जेआरडी स्वत: मात्र नेहमीच तिथं उतरत. मला वाटतं, नानी पालखीवाला हेही बऱ्याच वेळा तिथं राहत. टाटा समूहातले इतर उच्च अधिकारी पंचतारांकित हॉटेल्स अधिक पसंत करीत. त्यामुळे टाटा बंगल्याच्या देखभालीचा खर्च, रहिवाशांच्या मानानं जास्तच वाटत असे. तेव्हा इतर उच्च अधिकाऱ्यांनाही टाटा बंगला खुला करून द्यावा का, अशी चर्चाही काही वेळा होत असे. पण माझ्या समजुतीप्रमाणे जेआरडींचा त्याला सक्त विरोध होता.

**जेआरडींचं पहिलं प्रेम?**

१९७८पर्यंत जेआरडी, टाटा समूहाप्रमाणेच 'एअर इंडिया'चेही अध्यक्ष होते. बॉम्बे हाऊसमधल्या त्यांच्या काही सहकाऱ्यांचं ठाम म्हणणं होतं की, 'एअर इंडिया' हे जेआरडींचं पहिलं प्रेम होतं आणि 'एअर इंडिया'चं काम संपल्यानंतरच ते टाटा समूहाच्या कामाकडे वळत. नागरी विमानवाहतूक क्षेत्राविषयी जेआरडींना प्रचंड आकर्षण होतं. त्याचे सर्व बारकावे त्यांना तपशिलानं माहीत असत. याउलट टाटा समूहात खूप कंपन्या होत्या आणि त्यांना विविधतापूर्ण उच्च तंत्रज्ञानाची गरज भासत असे. त्या कार्यक्षमतेनं चालविण्यासाठी आपल्याला तज्ज्ञांवर भिस्त टाकावी लागेल, याची जाण जेआरडींना होती. आपल्या मर्यादांची जाणीव हा जेआरडींच्या कार्यशैलीचा व दृष्टिकोनाचा पाया होता, मग काम टाटांचं असो की 'एअर इंडिया'चं.

❖


आंतरराष्ट्रीय राजकीय इतिहासाचा वेध घेता घेता
एका जगावेगळ्या व्यक्तिमत्त्वाची
त्याच्या असंख्य भल्याबुऱ्या कंगोऱ्यांसह
करून दिलेली ही ओळख

पुतिन
महासत्तेच्या इतिहासाचे अस्वस्थ वर्तमान

गिरीश कुबेर




आवृत्ती आठवी । किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली ‘राजहंसी’ पुस्तके



सोनाली कुलकर्णी एक गुणी अभिनेत्री. सोनाली माणसांना वाचते आणि शब्दांतून त्यांची व्यक्तिचित्रं रेखाटते. अशा संवेदनशील, संवादोत्सुक अभिनेत्रीला पाहण्या-ऐकण्याएवढंच ‘वाचणं’ही किती लोभस असू शकतं, याचं उदाहरण म्हणजे...

### सो कुल.. टेक २

सोनाली कुलकर्णी

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

मानवी भावभावनांची आणि पर्यायाने मानवी वर्तनाची पाळेमुळे मेंदूत असली पाहिजेत, या विज्ञानाच्या विचारधारेला बळकटी देणारे, मेंदूविज्ञानाबद्दल कुतूहल जागृत करणारे

### आपले वर्तन ↔ आपला मेंदू

डॉ. आनंद जोशी / सुबोध जावडेकर

किंमत : ₹ ४४०/- । (ट.ख. ₹ ५०)





ही आहे मुक्त मुशाफिरी... नानाविध प्रदेशांची, भौगोलिक तसेच मानसिकही. हेतू, साधने आणि साध्य काहीही असो, आहे कमालीची आनंददायी आणि चिंतनगर्भ.

### आनंदाच्या दाही दिशा

एक मुक्त प्रवास

डॉ. आरती रानडे

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)



# चित्र पाहीन आवडी

## गडद आशय, बीभत्स रस व शरीररचना दाखवणारी चित्रे

सर्व कलांमध्ये भावनांना महत्त्व आहे, हे सर्वमान्य आहे. भारतीय कला परांपरांमध्ये 'नवरस सिद्धान्त' महत्त्वाचा मनाला गेला आहे. शृंगार, हास्य, करुण, क्रोध, क्रौर्य, वीर अशा रसांचा वापर मोठ्या प्रमाणावर होताना दिसते. अर्थात एकूण कलाजगतात त्यातील बीभत्स रस हा कमी प्रमाणात वापरला गेला आहे. कथेची आणि मिथकाची गरज भागवताना, दृश्यात मांडणी करताना बीभत्स रस वापरलेला दिसतो. जसे की भारतीय शिल्पकलेत चामुंडा देवीचे शिल्प, अस्थिपंजर स्वरूपात शरीररचना दर्शवलेले असते. ही भयावह आणि बीभत्स यांच्या सीमारेषेवर असलेली दृश्य प्रतिमा म्हणता येईल. चामुंडा देवीची शिल्पे कृश आणि जवळजवळ विवस्त्र अवस्थेत असल्यामुळे त्याचा योग्य परिणाम साधतो. चामुंडा देवीही मातृकारूप असून गळ्यात मुंडमाळ मिरवते आणि अघोरी पंथाचे साधक तिचे भक्त असतात. तसेच काहीसे छिन्नमस्ता देवीचेही आहे. मस्तक छाटले आहे आणि मानेतून रक्ताच्या चिळकांड्या उडत आहेत, असे काहीसे दृश्य ह्या प्रतिमेत असते. हातात कपालक असून त्यात ती रक्त साठवत असते, असे चित्र आणि शिल्प छिन्नमस्ता देवीचे असते. दृश्यात रक्त दाखवले की, रंगामुळे त्याचा परिणाम वाढतो. दगडी शिल्पात रंगाचा परिणाम दिसून येऊ शकत नाही, त्यामुळे त्यातील गडद आशय कमी परिणाम करतो.

भैरव किंवा तत्सम उग्र देवतेच्या प्रतिमादेखील अशा अनेक मुख असलेल्या असतात. उदरावर, मांडीवर, खांद्यांवर आणि सर्वत्र मुखे असलेल्या अशा प्रतिमा असतात. कर्नाटकात भूत मुखवटे असतात, तेही याच गडद आशय धाटणीतील असतात.

या संदर्भात चित्रपरंपरा इतर देशात कशी दिसते ते पाहू. बॉश हा इटालियन चित्रकार पंधराव्या शतकात चित्रातून गडद आशय, बीभत्स रस व शरीररचना दाखवणारी दृश्ये दर्शवतो. परंतु त्याचा संदर्भ हा साहजिकच ख्रिस्त धर्मातील वर्णीत नरक वगैरे प्रकाराशी संबंधित आहे. पुढे प्रसिद्ध फ्रेंच चित्रकार फ्रान्सिस्को गोया याच्या चित्रात समाजात प्रत्यक्ष घडणारे अन्याय आणि समाजातील विरोधाभास दाखवणारे अनेक घटक दिसतात. गोया मानवाला तो कसा अमानवीय होत आहे, याचे दर्शन घडवत असतो. एका चित्रात एक राक्षस मिथक एका स्त्रीला सोलून खात आहे, असे चित्रित केले आहे. या आणि यांसह अनेक कलाकृतींमध्ये मानवाची अमानवी



कृत्ये दर्शवली आहेत आणि त्याचा परिणाम साधला आहे. विदेशात डेमीन हर्स्ट या चित्रकाराने एका बाजूची त्वचा सोललेल्या घोड्याचे शिल्प बनवलेले दिसते. अर्थातच कालसापेक्ष गडद आशय, बीभत्स रस यांचे अर्थ बदलतात. भारतात सूझा, गणेश पाईन, भूपेन खक्कर, जोगेन चौधरी अशा चित्रकारांच्या काही चित्रांत हा बीभत्स रस दिसून येतो.

भारतात आज सर्वसामान्य जन बीभत्स रस व शरीररचनाचित्र म्हणतील अशी चित्रे मीठु सेन करताना दिसते. समकालीन कलाजगतात तिला मानाचे स्थान आहे. परंतु अनेक नवोदित कलाकार मंडळी आपल्या कलानिर्मितीत अशी रूपके सरळसरळ वापरताना दिसतात.

मूळचा पुण्यातील आणि आज लंडनस्थित असलेला चित्रकार केदार नामदास हा अशा प्रकारे कलाकृती निर्माण करणारा म्हणायला हवा. त्याचे शिक्षण बडोदा येथील सयाजीराव विद्यापीठात झाले असून, पुढील उच्च शिक्षण तो सध्या परदेशात घेत आहे. हा संवेदनशील कलावंत आज आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या राजकीय घडामोडी, सामाजिक अत्याचार आणि झुंडशाही यांबाबत फार प्रखर आणि प्रभावी भाष्य करतो. हे करताना जी दृश्यभाषा तो वापरत असतो, ती बहुधा बीभत्स रस व शरीररचनाचित्र यांच्या मिश्रणातून सत्यदर्शी स्वरूपात दाखवण्याचा त्याचा प्रयत्न



दिसतो. शक्तिप्रदर्शन, अत्याचार, लिंगभेद आणि अशा अनेक समस्यांवर तो प्रकाश टाकतो. ही भाषा प्रखर असते आणि कदाचित ही चित्रे पाहू नये असे सामान्य माणसाला वाटेल अशी रूपचित्रे असतात. आपण जेव्हा एखाद्या पीडित महिलेबाबत बातमी वाचतो, तेव्हा मनात चीड निर्माण होते. पण जेव्हा असे दृश्य चित्रात येते, तेव्हा मनातील रस हा बीभत्स रसाकडे जाऊन 'आपण असे चित्र का पाहत आहोत?' किंवा 'अशी चित्रे का काढतात? त्यामागील भूमिका काय?' असे प्रश्न प्रेक्षकाला पडू शकतात. जसे की, चित्रात ती घटना आपल्यासमोर घडत आहे अशी भावना येत राहते आणि मानवी मनावर त्याचा खोल परिणाम होताना दिसतो. अशा चित्रात मानवी हात, पशू यांसारखी काही गडद रूपके प्रत्यक्ष दिसतात; तर काही अपरिचित वाटून जातात. 'चित्र पाहीन आवडी'च्या या प्रवासात आपण केदारचे एक गडद आशय, बीभत्स रस व शरीररचना दाखवणारे चित्र पाहू.

हे चित्र अत्याचार दर्शवते, शिवाय बीभत्स रस व शरीररचनाचित्र दोन्ही घटक परिणामकारक पद्धतीने दिसून येत आहेत. पीडित महिलेचे प्रतिनिधित्व ही चित्रातील मध्यवर्ती स्त्री करत असावी. त्वचा जणू सोलली आहे आणि स्नायू उघडे पडले आहेत, अशी ही आकृती आहे. उजव्या बाजूला एक पशू दिसत असून तो अत्याचारी प्रवृत्तींचे निदर्शक आहे, हे वेगळे सांगायला नको. विळा हातात दाखवला आहे, तो

शक्तीच्या गैरवापराचे द्योतक आहे. अनेक अत्याचारी हात चित्राचा भाग बनले आहेत. आजच्या काळाचा संदर्भ देताना लोखंडी कॉटवर ती महिला दाखवली असून खालील चादरीवर पुरुषसत्ताक प्रवृत्तीचे द्योतक म्हणून लिंगे दर्शवली आहेत. रंगसंगती लाल, काळ्या रंगांची आहे आणि त्यामुळे चित्रातील आशय ठसण्यास मदत होते. एकूणच मनात चीड उत्पन्न करणारे हे चित्र, समाजात अशा अमानुष घटना घडत असतात ते दर्शवते. त्याचे चित्रण असे चित्रकार करीत असतात. आपल्या चित्रातून केदार आजच्या कोणत्याही वृत्तपत्राच्या एखाद्या पानाबद्दल, त्यातील अत्याचारसंबंधित बातमीबद्दल बोलतो आहे; असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

शब्दमाध्यमापेक्षा कधीकधी दृश्यमाध्यम जास्त त्रास देते, कारण कदाचित ते जास्त प्रभावशील असू शकते. गडद आशय, बीभत्स रस व शरीररचना दाखवणारी चित्रे किंवा शिल्पाचा काळ, संस्कृती, समाज, संदर्भ बदलला, की आशय बदलतो; दृश्यात आणि वर्णविषयात जरी साधर्म्य असले तरीही.

***नितीन हडप,*** ९३७२४१८६१५

दीनानाथ दलालांनी जनसामान्यांच्या घराघरांत आणि मनामनांत आपली चित्रे पोहोचवली. विविध प्रयोगांमधून कलेची वेगवेगळी क्षितिजे धुंडाळणाऱ्या या रंगरेषाप्रभूच्या जीवनाचे वेगवेगळे पैलू दर्शवणारे वेधक चरित्र

रंगांचा जादूगार **दीनानाथ दलाल**

डॉ. अनंत देशमुख

किंमत : ₹ १७०/- । (ट.ख. ₹ ५०)







१८५७-१९५० या काळाच्या पार्श्वभूमीवर आजवर अपरिचित असलेल्या पाच स्त्री चित्रकार! अँजेला त्रिंदाद, अंबिका धुरंधर, विमल गोडबोले, मारी हेंडरसन, मग्दा नाख्मन यांच्या कौटुंबिक जीवनाचा आणि कर्तृत्वाचा शोध आणि बोध!

'बॉंबे स्कूल' कला परंपरेतील
**स्त्री चित्रकार** (१८५७-१९५०)

साधना बहुळकर

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)



# असे जन्मले पुस्तक!

फकिरी

लेखनासाठी हा विषय निवडावा एवढा खोल विचार नाही केला कधी, पण असंच एक दिवस सहज लक्षात आलं अन् मागं वळून आपलं बालपण पाहिलं... झालेली फटफजिती, माय-बापासोबत पोटापाण्यासाठी झालेली भ्रमंती - भटकंती नव्हे - फकिरी. टीचभर पोट भरण्यासाठीही वणवण भटकावं लागे. मायबाप अन् पाच बहिणींसोबत बिऱ्हाड पाठीवर घेऊन; दरकोस, दरमुक्काम करत, ऐन दुष्काळात खडीच्या साली, तर बाराही महिने रोजंदारीनं गाव-शिवारात दुसऱ्याच्या बांधावर मोलमजुरी करण्यासाठी...! म्हणून माझ्या गत आणि सध्याच्या या फिरस्ती आयुष्याला एकदम फिट बसलेला सहज शब्द म्हणजे 'फकिरी'.

काट्या-कुट्यांनी अन् दगड-धोंड्यांच्या वेड्यावाकड्या वळणांनी ओरबडलेलं माझं जीवन जसंच्या तसं मांडण्याचा प्रयत्न पुस्तकात केला आहे. त्यात कुठे अचकून, दबून त्याला बेगड देण्याचा किंवा भाषेला वळवण्याचा अजिबात प्रयत्न केला नाही.

अनेक प्रकारची सरमिसळ करत नावीन्याचा शोध घेणाऱ्या, तेच ते शोधत बसण्यापेक्षा 'या 'फकिरी' नावामुळे नेमकं काय..?' हा प्रश्न पडलेले अनेक नवनवे व परिवर्तनाच्या वाटेवरील तगमगे वाचक फकिरीला स्वीकारतील, अशांनाच विचारात घेतलं आहे. निव्वळ सुरुवात करणारा वाचकही फकिरी हातातून खाली ठेवणार नाही, असा ठाम विश्वास आहे.




किंमत : ₹ ३९५/- । (ट.ख. ₹ ५०)

कोविडच्या पहिल्या भयभीत, संक्रमित काळात आनंदग्रामला कायम थांबवण्यात आलं. इथे एचआयव्ही-पीडित लेकरं असल्यानं त्यांची विशेष काळजी घ्यावी लागे... तिथे कुणाला येऊ न देणं व कोणाकडे सहसा न जाणं, या माझ्या दिनचर्येमुळे अनायासेच माझी विपश्यना झाली.

दिवस-दिवस पडून राहावं, बसावं लागे... त्यात मी मागे वळून पाहिलं आणि

माझ्या हृदयाचे अनेक कप्पे उघडले. भूतकाळ उलगडायला, उचकायला तेवढा वेळ मिळत गेला, तसे काही अंगावर येणारे प्रसंग मी माझ्या डायरीत नोंदवून ठेवले होते. काही नोंदी पत्रांतून, मित्रांच्या समकालीन भेटींतून, फोनद्वारेही मिळवल्या. त्या आठवणी, खाणाखुणा पुन्हा जाग्या होताना अक्षरशः कसंतरी वाटे.

आदी आणि अंतिम भटकंती, फिरस्ती पायपीट यांतून स्पष्टपणे फकिरी आकार घेत होती. अतिशय नैसर्गिकपणे, कुठलेही अघोरी उपचार न करता या आत्मचरित्रानं जन्म घेतला. जवळपास त्या काळात बहुतांश लेखन झालं; मग संध्या, पाटील सर, जोशी सर यांच्याशी बोलताना 'विविध कार्यक्रमांच्या निमित्तानं बोलताना सांगितलेले अनेक प्रसंग तुम्ही शब्दबद्ध करत चला...' हा मिळालेला मोघम सल्ला मला फलश्रुतीकडे घेऊन गेला अन् फकिरीचं लेखन झालं. त्यावर सोपस्कार अजिबात केले नाहीत. अनेक जण म्हणत; प्रकाशक भाषा बदलतात, पार चिरफाड करतात अन् त्यांचंच घुसडतात; पण मला तसा अनुभव अजिबात आला नाही.

ओढाताण, जाडाजोड, उचलाउचली, चिरफाड, चोरी-लप्पी, शोधा शोधा हे काहीच करावं लागलं नाही.

सुरुवातीला खूप लाज वाटे, आपण औकात सोडतोय असं मनाशी वाटे, 'भाऊ हदसे गुजर रहे हो' असं म्हणत माझंच मन मला मागे ओढी, पण मी तिथे धसमुसळेपणा केला, लाज सोडून बाहेर आलो अन् मनाच्या रचना करीत गेलो, त्या होत गेल्या एका हिसक्यात...!!

शिकत असताना पुस्तकावर लेखकाचं नाव वाचून कधीच वाटलं नव्हतं की आपलं नाव अशा एखाद्या पुस्तकावर येईल, आणि तेही 'राजहंस'सारख्या प्रख्यात प्रकाशनाच्या..! हे सर्व स्वप्नवत वाटलं आणि जेव्हा मला ही 'फकिरी'ची प्रत दिसली, तेव्हा 'फकिरी' हा शब्द डबडबत्या डोळ्यांमुळे धूसर झाला होता, अन् त्या ग्रंथावर अश्रुधारा पडल्या होत्या.





संगमनेर येथील एक होतकरू तरुण, स्थापत्य अभियंता. आपल्या अफाट कर्तृत्वाने मानवी अस्तित्वाशी सगळे एकेक कडीने जोडतो, जणू जीवन फुलवणारे...

पाषाणाचे पाझर

स्थापत्य अभियंत्याची कर्तृत्वगाथा

विवेक गाडगीळ

किंमत : ₹ ९५०/- । (ट.ख. ₹ १००)

कारण माझं लेखन मला विशेष वाटत नव्हतं. राजहंसकडे जाण्याचं धाडस होत नव्हतं अन् ते घेतील असं स्वप्नातही वाटत नव्हतं; पण त्यांनी हा ग्रंथ हाती दिल्याबरोबर क्षणार्धात मी पिंपळाएवढा उंच झालो अन् खरंच माझ्या या संघर्षात मला माझा भूतकाळ सापडला. त्या वेळी लक्षात आलं व सिद्धही झालं, की राजहंस हे नि:पक्षपातीपणे पुस्तक प्रकाशित करतं व तळागाळातील सामान्य माणसाचा आवाज बनतं. तिथे कशालाही थारा नाही.

खरं तर राजहंसनं पुस्तक घेतल्यामुळे व प्रकाशित केल्यामुळे मी मोठा होत आहे, याची प्रचितीही मला आली. तो क्षण खरंच सुवर्णाक्षरांत लिहावा एवढा मौल्यवान होता. त्यांनीच मला लिहितं केलं व त्यांच्यामुळेच मला पेन हाती धरायचं धाडस आलं, एवढं निश्चित...

मी 'फकीर'कार झालो, लेखक झालो, आता मोठा झालो; असा रात्रंदिन भास होत आहे. खरं तर मातीचं सोनं झाल्यासारखं वाटतं. त्यांनी माझ्या संघर्षमय जगण्याला एक अर्थ दिला अन् चेहराही दिलाच, असं मी नम्रपणे सांगतो व ते खरंच आहे.

२८ जानेवारी २०२४ रोजी 'फकिरी' प्रकाशित झाली. एमजीएम (MGM) विद्यापीठाचे कुलगुरु मा. कदमसाहेब, बजाज ग्रुपचे चेअरमन मा. सी. पी. त्रिपाठी, मुंबईचे विशेष सल्लागार मा. टी. एन. व्ही अय्यर, माजी मंत्री श्री. नवले, माजी मंत्री श्री. क्षीरसागर, मंत्री मा. बाळासाहेब थोरात, एमआयटीच्या सौ. कराड, मठाधिपती ह. भ. प. राधाताई, आ. तुपे तसेच विविध धर्मांचे धर्मगुरू आदींच्या हस्ते 'फकिरी'चा लोकार्पण सोहळा झाला.

'फकिरी'ची उत्सुकता अनेकांना होती. 'इन्फंट इंडिया' संस्थेचा प्रवास पुसटसा कळायचा, पण या ग्रंथामुळे तो अधिक गडद झाला. बालपण, शिक्षण, त्या वेळची पोटापाण्यासाठीची कुटुंबासमवेतची भटकंती, पुढे घेतलेलं काम, शिक्षण, मोठ्या


आजही राजकारणामध्ये सक्रिय सहभाग आणि
भारतीय जनता पार्टीचे प्रमुख नेते. अशा व्यक्तीने
वर्तमान राजकारणाला केंद्रस्थानी ठेवून
लिहिलेली ही कादंबरी.

काहूर एका वादळाचे

राजकुमार बडोले

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)




महत्प्रयासानं मिळालेली सरकारी नोकरी, प्रेरणामूर्ती प्रकाश आमटेंचा सहवास, पुढे उभारलेलं सेवाकार्य, त्यांची अखंडता, त्यासाठीची म्हणजे या दुर्धर आजारानं पीडित चिमुकल्यांमुळे करावी लागणारी भटकंती नव्हे..! फकिरी...

यावर आलेल्या अनेक प्रतिक्रिया वाचून मनस्वी समाधान व आश्चर्यही वाटलं.

'फकिरी'चं प्रकाशन असं विशेष करायचं नव्हतंच. मुलांच्या विवाह सोहळ्यातून अन् आनंदग्राम येथील अहिंसा पार्कच्या शुभारंभ-प्रसंगी कामात काम म्हणून अगदी सहजपणे 'तुम्हारे खत में हमारा सलाम' या उक्तीप्रमाणे कोणालाही फारशी कल्पना न देता 'फकिरी'चं हे लोकार्पण केलं. त्यासाठीचा खर्च, स्क्रीन, सजावट, वेळ व रुपयाची सांडलवंड कशाला? विशेष म्हणजे अंधारात फक्त मोबाईलच्या उजेडात 'फकिरी' प्रकाशित झाली. कारण तेव्हा अंधार पडेल असं वाटलं नव्हतं, वेळ चुकली अन् लग्नानंतर हे प्रकाशन झालं, तरीही त्या घाईमध्ये अर्ध्या तासानं एक कार्यकर्ता तिथे त्या अंधारात व भाऊगर्दीत ठाण मांडून बसला. अवघ्या काही मिनिटांत अगदी अधाशाप्रमाणे त्यानं फकिरीची २४ पानं वाचून काढली. मी त्याच्या जवळ जाऊन पाहतो, तर तो चमकून उभा राहिला, त्याच्या चेहऱ्यावर विशेष भाव होते अन्



तेव्हा मला " 'फकिरी'सोबत फोटो घेऊ" म्हणाला. माझ्यासोबत एक सेल्फी घेतला अन् म्हणाला, "भाऊ, अरे बापरे! भयानक संघर्ष करून आलात तुम्ही. तुम्ही संघर्षयोद्धाच गडे. मी निवांत वाचून फोन करतो." म्हणून तो गेला. ही प्रतिक्रिया एखाद्या नामांकित वाचकापेक्षाही विशेष वाटली, मीही पुरता हबकलो. असं काय वाटलं असावं त्याला, या विचारचक्रात पार बुडलो.

***दत्ता बारगजे***





समाजाने वेशीबाहेर ढकललेल्या आणि
खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्यापासून आजही वंचित राहिलेल्या
एका अन्यायग्रस्त जमातीची आक्रोशगाथा.
त्यांच्या उत्कर्षासाठी झटणाऱ्या एका तळमळीच्या
कार्यकर्त्याने मांडलेली कैफियत.

**पारधी**

गिरीश प्रभुणे

आवृत्ती सहावी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)



# आठवणींच्या खिडकीतून

## वास्तववादाची ऐशीतैशी

पन्नास आणि साठच्या दशकांमध्ये हौशी मराठी रंगभूमीवर वास्तववादाचे वारे वाहू लागले. नागरी आणि ग्रामीण वास्तव प्रामुख्याने तेंडुलकर, शं. गो. साठे, व्यंकटेश माडगूळकर यांच्या नाटकांमधून समोर आले. नाटक जर वास्तववादी आहे, तर त्याचा प्रयोगही वास्तववादी शैलीतच सादर झाला पाहिजे अशी जाणीव प्रयोगकांना होऊ लागली आणि तसे प्रयत्नही सुरू झाले.

तेंडुलकरांचे 'माणूस नावाचे बेट' (१९५६) हे नाटक मुंबईच्या 'ललित कला केंद्र' या संस्थेने सादर केले. दिग्दर्शक होते दामू केंकरे आणि नेपथ्यरचनाही त्यांनीच केली होती. नाटक मध्यमवर्गीय चाळीतील एका खोलीमध्ये घडते. ती खोली इमारतीच्या पहिल्या मजल्यावर आहे. पण प्रेक्षकांना ते कसे कळावे? प्रयोगामध्ये, खोलीच्या समोरच्या भिंतीत एक खिडकी होती. आणि खिडकीमधून रस्त्यावरच्या एका विजेच्या खांबाचा वरचा भाग आणि तिथे एकमेकींत गुरफटलेल्या तारा दिसत होत्या. त्या तारांमध्ये फाटलेला एक पतंग अडकलेला होता. (त्या पतंगाच्या प्रतीकात्मतेची खूप चर्चा त्या वेळी झाली होती.) तो प्रयोग म्हणजे हौशी रंगभूमीवरील वास्तववादी नेपथ्याचे ठळक उदाहरण होते. पण खांबात अडकलेला पतंग जरासाही फडफडत नव्हता, अशी तक्रार होतीच.

पुण्याच्या 'प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन' या संस्थेने व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'तू वेडा कुंभार' या नाटकाचा प्रयोग वास्तववादाच्या पुढे जाऊन यथातथ्यवादी शैलीमध्ये (naturalistic) सादर केला (१९६०). रंगमंचावर दिसत होते खेडेगावातल्या कुंभाराचे मातीचे घर आणि पुढे अंगण. तिथे कुंभाराचे भलेमोठे चाक. नाटकात सकाळचे दृश्य संपून लगेचच संध्याकाळचे दृश्य सुरू होते. रंगमंचावर दोन्ही बाजूंच्या विंगांमध्ये वरच्या बाजूला स्पॉटलाईट टांगून ठेवले होते. त्यांच्या प्रकाशझोतांची तीव्रता कमी-अधिक करण्यासाठी ते निरनिराळ्या प्रकाश-नियंत्रकांना (dimmers) जोडले होते. एका बाजूने येणाऱ्या प्रकाशझोताची तीव्रता हळूहळू वाढत जाऊन मध्यान्हीचा प्रखर प्रकाश अंगणभर पसरला आणि त्यानंतर प्रकाशाची दिशा बदलून त्याची तीव्रताही क्रमाक्रमाने कमी होत जाऊन अंगणात निळीभोर रात्र उतरली. राज्यनाट्यस्पर्धेतल्या त्या प्रयोगावेळी प्रकाशयोजना हाताळणाऱ्या शशिकांत कुलकर्णी या तरुणाने सकाळ ते रात्रीपर्यंतचा प्रकाशाच्या पोतामध्ये होत गेलेला बदल

इतका अलगद, इतक्या नजाकतीने घडवला की, प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. स्वातंत्र्यपूर्व काळात 'ललितकलादर्श' या संस्थेच्या नाट्यप्रयोगांची नेपथ्यरचना पु. श्री. काळे करीत असत. त्यांनी साकारलेले नेपथ्य इतके हुबेहूब असे की, पडदा वर जाताक्षणी ते नेपथ्य पाहून प्रेक्षक टाळ्या वाजवीत. 'पडद्याला टाळी' असा शब्दप्रयोग त्या वेळी आणि नंतरही कित्येक वर्षे रूढ झाला होता, तशी ही 'प्रकाशयोजनेला टाळी'. पण प्रकाशयोजनेची ती किमया घडत असताना अंगणाच्या पलीकडच्या झाडावरचे एकही पान दिवसभरात जमिनीवर पडले नाही, हे कसे?

'महाराष्ट्रीय कलोपासक' ही पुण्यातली पन्नास आणि साठच्या दशकांत नावाजलेली मातब्बर नाट्यसंस्था. संस्थेने १९६४मध्ये गो. गं. पारखी यांचे 'कथा कुणाची व्यथा कुणा' हे रहस्यप्रधान नाटक राज्यनाट्यस्पर्धेत सादर केले आणि एकूणएक पारितोषिके मिळवली. पडदा वर जाताच रंगमंचावर दिसते मुग्धा. सकाळ झाली, तरी अंथरुणात लोळत पडलेल्या आपल्या नवऱ्याला ती हाक देते - "अहो, उठा. अंबरनाथ लोकल गेली म्हटलं..." राजा नातू यांचे दिग्दर्शन असलेल्या त्या प्रयोगात पडदा वर जात असतानाच प्रेक्षकांच्या डाव्या बाजूने आगगाडीचा आवाज येत असे आणि रुळावरून धडधडत प्रेक्षकांच्या उजव्या बाजूला ती दूरवर गेल्याचे ऐकू येत असे. निरनिराळ्या दिशांनी आवाज येत असल्याचा परिणाम स्टिरिओफोनिक रेकॉर्डरच्या मदतीने साधला जाऊ शकतो, हे नाटकवाल्यांना नव्यानेच कळले होते. तसा परिणाम प्रथमच नाट्यप्रयोगात साधल्याचे श्रेय राजा नातू यांचे. वातावरणातील इतर आवाज ऐकू येऊ नयेत आणि फक्त आगगाडीचा आवाज ऐकू यावा यासाठी सकाळी लवकर, पुण्याच्या शिवाजीनगर स्टेशनच्या सिग्नलजवळ रेल्वेमार्गापाशी रेकॉर्डर ठेवून राजा नातू यांनी पुणे-मुंबई मार्गावरच्या आगगाड्यांचे स्टिरिओफोनिक





साठोत्तर प्रायोगिक (समांतर) मराठी रंगभूमीचे
केवळ साक्षी नव्हे, तर निरनिराळ्या नात्यांनी
प्रत्यक्ष सहभागी असलेले
प्रतिभावान रंगकर्मी माधव वझे यांनी
अनेक संदर्भबिंदूंच्या मदतीने घेतलेला
पाश्चात्त्य आणि मराठी रंगभूमीचा अभ्यासपूर्ण वेध.

**समांतर रंगभूमी** : पल्याड-अल्याड

माधव वझे

किंमत : ₹ २९०/- । (ट.ख. ₹ ५०)

ध्वनिमुद्रण केले. नाट्यप्रयोगात प्रसंगानुरूप त्याचा सुंदर उपयोग केला. आगगाड्यांच्या त्या ध्वनिमुद्रणाचे महाराष्ट्रात सर्वत्र कौतुक होत असताना एक दिवस श्री. करमरकर यांचा राजा नातू यांना फोन आला. हे करमरकर म्हणजे बालनाट्याच्या प्रवर्तक सुधा करमरकर यांचे यजमान. तर, करमरकरांनी 'कथा कुणाची'च्या प्रयोगाची आधी स्तुती केली आणि मग म्हणाले की, 'तुमचे नाटक मुंबईत घडते आहे आणि अंबरनाथ लोकलचा अगदी सुरुवातीलाच जर उल्लेख आहे, तर मुंबईतल्या उपनगरी आगगाड्यांचेच ध्वनिमुद्रण तुम्ही करायला हवे होते. पुणे-मुंबई दरम्यान धावणाऱ्या आगगाड्या आणि मुंबईतल्या उपनगरी लोकल्स यांचा ऐकू येणारा ताल आणि ठेका वेगवेगळा आहे आणि मुंबईकरांना तो अगदी सहज जाणवतो.' - म्हणजे वास्तववादाचा दावा फोल ठरला म्हणायचा.

पु. ल. देशपांडे यांचे 'सुंदर मी होणार' हे नाटक एका हौशी नाट्यसंस्थेने करायला घेतले. एका संस्थानिकाच्या प्रासादात नाटकातल्या घटना घडतात. नाटकाची रचना करताना या प्रासादातला एक दिवाणखाना रंगमंचावर दाखवण्याचे संस्थेने ठरवले. साहजिकच मोठमोठे खांब, तुळया, शिवाय उंच, गोलाकार खिडक्या, गालिचे, लाल रंगाची गुबगुबीत आसने, उंची काचसामान - अशी योजना झाली. मग विचार आला, त्या दिवाणखान्यात पोपटाचा एक पिंजरा असावा. नाटकाच्या आशयाशी तो सुसंगत ठरेल असे कोणी म्हटले. अर्थातच तेही मान्य झाले. प्रयोगावेळी पडदा वर जाताच त्या दिमाखदार नेपथ्याला प्रेक्षकांनी टाळी दिली. नाटक सुरू झाले. नटनटी त्यांचे संवाद म्हणू लागले. पण त्याचबरोबर पिंजऱ्यातल्या पोपटानेही त्याची पोपटपंची सुरू केली. एक क्षणभरही न थांबता पोपट कर्कश आवाजात इतके बोलू लागला की पात्रांचे संवाद प्रेक्षकांना ऐकू येईनासे झाले. प्रेक्षक पोपटालाच उत्तेजन


स्थलांतर करू पाहणाऱ्या पक्ष्यांच्या एका थव्याला
प्रवासामध्ये अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.
एका टप्प्यावर प्रत्यक्ष नेत्याचे नीतिधैर्य संपते.
नेताहीन थवा दिशाहीन होऊन विखुरतो,
प्रवासात शिकून शहाणा होत असलेला एक
लहान पक्षी त्याला धीर देतो. त्याची गोष्ट सांगणारे -




नंदनवन (संगीत-नृत्य-नाट्य)

माधव वझे

किंमत : ₹ ५०/- । (ट.ख. ₹ ५०)

देऊ लागले. आता काय करावे? - पहिला अंक नटनटींनी कसाबसा ओढला आणि तो अंक संपल्यावर लगेचच पोपटाचा पिंजरा काढून तो नाटकाच्या सामानाच्या खोलीत नेऊन ठेवला.

वास्तववादाची अशी ऐशीतैशी जागतिक रंगभूमीवर वेळोवेळी झाली आहे. तात्पर्य : नाटक खोटे असते. तिथे जे काही घडते, ते खरे मानून घ्यायचे असते. तुकोबा म्हणतात -

*नटनाट्य तुम्ही केले याचसाठी । कौतुके दृष्टी निववावी ॥*
*नाही तरी काय कळलेचि आहे । वाघ आणि गाय लाकडाची ॥*

**माधव वझे,** ९६०४८४८०३३

मिस्कील आणि मनस्वी. प्रेमळ आणि फटकळ.
नर्मविनोदी आणि स्पष्टवक्ती.
आग्रही आणि पारदर्शी.
सईच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू
उलगडणारे आत्मकथन!




सय

माझा कलाप्रवास

सई परांजपे

आवृत्ती सहावी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

रसाळांना जशी माणसे आठवतात, गावे आठवतात;
तसा तो काळही आणि त्यावेळची संस्कृतीही आठवते.
ही व्यक्तिचित्रे जशी काही गावांची आणि
काही माणसांची आहेत, तशीच ती
एका मावळलेल्या संस्कृतीचीही आहेत.
- नरेन्द्र चपळगावकर




माणसं जिव्हाळ्याची

सुधीर रसाळ

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

## क...
## कवितेचा

मराठी मनाच्या सर्जनशीलतेला
पाऊलवाट देणारे सदर

### बावरी

गर्द हिरवी पंचक्रोशी
भारलेली शांतता
शब्द गहिरा उमटला
पण माध्यमाला पारखा

झाड वेडे वाकले
अन् हासली चारुलता
ओठही विलगून गेले
दृश्य नयनी पाहता

उमलत्या कलिकेत होती
बावरी ती अधिरता
एकली मी या इथे
झाकू कशी अस्वस्थता

शब्द माझे कुंठले पण
भाव मनिचे वाहती
पोचवी या भावना
वाऱ्यास वेली विनविती

नीलगगना उंच तुझी
नजर फिरते चहुकडे
मीच माझ्या जिवलगा
का आज न कळे नावडे

बहरलेल्या कोवळ्या
पानांत लपली प्रखरता
शांत झोका घेत आता
संपली ती आर्तता

***राजीवलोचन श्रीधर पुंडलीक***
९९२३७५६६४८

## ‘राजहंसी’ विविधा




श्रीनिवास रामचंद्र उर्फ अण्णासाहेब बोबडे यांची कविता विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातली. एकीकडे संस्कृत काव्याचे संकेत सांभाळणारी आणि दुसरीकडे पोवाडे व लावण्यांची कास धरणारी, समरांगणात आणि रतिरंगणात सारख्याच चैतन्याने चमकणारी.

### कळो न कळो रे

श्रीनिवास बोबडे

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ५०)

आशय, अभिव्यक्ती व भाषा अशा काव्याच्या अंगांनी समृद्ध असलेली ही कविता केवळ आंबेडकरीच नव्हे, तर समकालीन मराठी कवितेची कक्षा विस्तारणारी कविता आहे!

### रक्तफुलांचे ताटवे

नोमेश नारायण

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)






एकाच कवीने तीन वेगवेगळ्या काळांच्या पटावर नजर ठेवून आयुष्याचे जे तत्त्वज्ञान तयार केले आहे, ते जगण्याचा हिशेबच. हा कवितासंग्रह म्हणजे कवीच्या जगण्याचा वैचारिक लेखाजोखा!

### आतून उगवलेल्या कविता

प्रा. प्र. द. कुलकर्णी

किंमत : ₹ १७०/- । (ट.ख. ₹ ५०)

## उद्‌गार

नियतकालिकांचे/
समाजमाध्यमांचे अभिप्राय

### ‘पत्र आणि मैत्र’ व ‘वाणी आणि लेखणी’

*‘राजहंस’चे बोधवाक्य आहे ‘विषयांचं वैविध्य, आशयाची समृद्धी’. ते जसे ‘राजहंस’चे रूप दाखवते, तसेच माजगावकरांच्या वृत्तीचेही राजहंसी रूप दाखवते. हे रूप वाचकांनी या दोन खंडांत डोकावून पाहिले पाहिजे, मग ‘पुस्तकाशी जडले नाते’ म्हणवणारा वाचक माजगावकररूपी समृद्ध पुस्तकच यातून पाहील.*

प्रकाशन विश्वातील ‘मिडास’ स्पर्शासाठी ज्ञात असलेल्या प्रकाशक दिलीप माजगावकर यांची पत्र, वाणी, लेखणीची महत्त्वाची ‘बासनं’ दोन महाखंडांत संपादकांनी मोकळी करून वाचकांसाठी मोठ्ठा खजिना उपलब्ध करून दिला आहे. प्रत्येक खंडाविषयी खरे तर; स्वतंत्रपणे लिहायला हवे इतकी ही ‘अलिबाबाची’ गुहा मोठ्ठी आहे, अमूल्य आहे. पण वाचकांनी ही पुस्तके आवर्जून वाचावीत आणि समृद्ध व्हावेच; या हेतूने इथे फक्त त्यांची तोंडओळख करून देण्याचा प्रयत्न. गंगा घागरीत भरावी तसा.

मराठी साहित्यक्षेत्रात गेली साठ वर्षे सजगपणे दिलीप माजगावकर वावरले आणि त्यातील चाळीस वर्षे प्रकाशक म्हणून त्यांनी भलेभले लेखक हेरले, ‘राजहंस’चा व्याप सांभाळला, माणसे जोडली-राखली, शब्दांचा सोहळा केला, उद्योगजगतातील चक्रव्यूह भेदले, वाचन केले, लेखन केले. प्रसंगपरत्वे पत्रे लिहिली, भाषणे केली. ‘माणूस’पासून सुरू झालेला त्यांचा पुस्तकसंसार बहरत गेला. ‘तोडता तरू फुटे आणखी भराने’ अशी भरभराट प्रकाशनविश्वात झाली. त्यांची स्वत:ची नाममुद्रा उमटली. त्यातील ‘वाणी आणि लेखणी’चा प्रत्यय वाचकांना एकत्रितपणे यावा, यासाठी हा खंड जवळ असणे भागच आहे. तसे ‘दिगमा’ स्वत:ला (अधिकृत) पुस्तकलेखक मानीत नाहीत, पण प्रसंगपरत्वे त्यांनी जबाबदारीने पत्रे लिहिली. प्रकाशनावेळी भाषणे केली. कर्तव्यबुद्धीने भूमिका पार पाडताना आपल्या विचारांची चोख मांडणी केली. माणसांमधील नाती जपली. माणसांमधील लेखक हेरला. व्यवसायासाठी जाहिराती मिळवताना भ्रमंती केली. विविध लोकांशी ऋजुतेने, प्रामाणिकपणे भावनिक ओलावा जपला. आदर राखला. व्यवसायातील कठीण निर्णय घेताना व्यवसायप्रमुख ही भूमिका

माणुसकी राखून निभावली. 'माणसाने माणसाशी माणसासम वागणे' म्हणजे काय, ते या पुस्तकातून प्रत्ययाला येते.

'माणूस' साप्ताहिकापासून त्यांचा या क्षेत्रातील अनोखा आणि 'हा दुर्धर घाट' असा प्रवास सुरू झाला. त्याच्या पाऊलखुणा पाहणे केवळ रंजक नाही, तर उद्बोधक आहे. 'आम्ही प्रकाशकांनी प्रेस काढले, तिथे मशिनमध्ये गुंतवणूक केली. तशी गुंतवणूक माणसांमध्येही करण्यात आम्ही लक्ष दिले नाही' हे त्यांना उमगते अन् माणसांमधली गुंतवणूक ते वाढवताना दिसतात, नाती जपताना दिसतात. त्याचा प्रत्यय वाचकांना नकळत आदर्श धडे देऊन जातो. 'राजहंस'चे बोधवाक्य आहे 'विषयांचं वैविध्य, आशयाची समृद्धी'. ते जसे 'राजहंस'चे रूप दाखवते, तसेच माजगावकरांच्या वृत्तीचेही राजहंसी रूप दाखवते. हे रूप वाचकांनी या दोन खंडांत डोकावून पाहिले पाहिजे, मग 'पुस्तकाशी जडले नाते' म्हणवणारा वाचक माजगावकररूपी समृद्ध पुस्तकच यातून पाहील. चांगल्या लेखकाची प्रकाशक म्हणून ते सोबत करतात; त्यामागची भूमिका समजून घेईल. माजगावकर असे स्वयंसिद्ध आहेत, हे त्याला उलगडेल. एक छोटीशी साक्ष काढता येते. याबाबतीत २००६ साली गिरीश प्रभुणे यांना लिहिलेल्या पत्रात श्री. पु. भागवत म्हणतात, 'माजगावकरांनी कधी प्रकाशक म्हणून आपले अनुभव प्राधान्यानं सांगण्यासाठी आत्मचरित्र लिहिलं, तर 'मौज प्रकाशना'चं प्रकाशन झालेलं मला आवडेल.' 'वीरही वीर की कद्र कर सकता है!' फार दुर्मीळ अशी ही श्री.पुं.ची दाद आहे. बरं; परत ती तोंडदेखली नाही. कारण हे गिरीश प्रभुणेंजवळ व्यक्त झालेले लेखी मत आहे. पुस्तकविश्वातील अप्रूप ठरावी अशी विरळाच दाद! या खंडांत त्याच दिशेने संपादकांनी गुणिजन माजगावकर हेरण्याचा/दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. फार यशस्वी प्रयत्न.

सिद्धहस्त प्रकाशकाच्या लेखणी-वाणीची झलक पाहणे म्हणूनच वाचकांलेखी ऐतिहासिक साक्ष ठरते. त्यासाठी संपादकांनी जे काटेकोर विभाग केलेत, त्यांची नावेही सार्थ. माजगावकरांची प्रासंगिक भाषणे एका विभागात येतात. त्याचे नाव आहे 'अवधारिजो जी...'. ज्ञानेश्वरांचा शब्द आहे हा. 'ऐका' नव्हे, तर 'अवधारिजो'. म्हणजे जे ऐकाल, ते अवधारण करा. या विभागात एकूण तीस भाषणे आहेत. त्यात प्रासंगिकता आहे; पण सहज जाताजाता वेळ निभावून प्रसंग साजरा करण्याची वृत्ती नाही. 'बनचुके'पणा तर नाहीच नाही. 'अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ' पारितोषिक वितरण समारंभात त्यांनी प्रकाशक म्हणून प्रकाशनासंदर्भात आत्मपरीक्षण केले आहे. 'निर्मिती ही केवळ स्वत:च्या आनंदासाठीच करायची असते आणि एकदा या आनंदाची गोडी लागली... की मग पुस्तकाच्या तांत्रिक बाजूकडे आपोआप आपण लक्ष द्यायला लागतो...' (पृ. १७) हाताखाली काम करणाऱ्या माणसांचाही विचार करायला हवा... असे अनुभवांतून येणारे शहाणपणाचे बोल अशा वेळी

केवळ भाषणबाजी ठरत नाही; तर एक व्यावसायिक निरीक्षण आणि परीक्षण असते ते. पाडगावकर, तेंडुलकर, श्री. पु. भागवत, पुरंदरे आदी सर्वांच्याच प्रेमात राहून त्यांची 'गुण गाईन आवडी' वृत्तीने स्व-भाव वैशिष्ट्ये सांगितली आहेत. 'सम आर मोअर इक्वल' असा भाव कुठेच नाही. प्रकाशक म्हणून अनुभवशिदोरी आहे, अहंभाव कुठेच नाही. या पुस्तकात न आलेला एक समांतर अनुभव श्री.पुं.च्या संदर्भातला वाचक म्हणून मला आठवून गेला. 'मुंबई मराठी साहित्य संघा'त 'वि. पु. भागवत प्रकाशक पुरस्कार' सोहळ्याचे दिगमा एका वर्षी अध्यक्ष होते. पुरस्कार 'लोकवाङ्मया'ला होता. सतीश काळसेकरांनी तो स्वीकारला. अध्यक्षीय भाषण झाले. श्रोत्यांमधून श्री. पु. भागवतांनी बोलण्याची अचानक परवानगी मागितली. अध्यक्षीय भाषण हा समारोप असतो. पण पदाचा कोणताही दुरभिमान न बाळगता दिगमांनी ती आनंदाने दिली. श्री.पुं.चे ते शेवटचे भाषण ठरले. अशी स्मरणीय नोंद केवळ दिगमांच्या माणसाला समजून घेऊन वागण्यामुळे इतिहासात झाली. या पुस्तकात अशा अनेक घटनांचे वाचक साक्षीदार होतात.

'समांतर'मध्ये 'वाणी'पाठोपाठ 'लेखणी' येते. पहिलाच लेख येतो तो श्रीभाऊंवर. ते एक 'उघडे पत्र' आहे. श्रीगमा गेल्यावर. आपल्या माणसावर भावनांचा बांध घालून लिहिणे अवघडच. पण दिगमा फार दूरस्थ राहून, व्रतस्थ राहून 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी'चा अनुभव वाचकांना देतात. वडीलभावाच्या कर्तृत्वाचा आढावा घेत, स्वत:चे त्या वेळचे आडाखे चुकल्याचे अपयश मांडत येणारा हा आत्मसंवाद इतका नितळ आहे की, वाचक या लेखात खिळून जातो. हा फक्त एक मासला. विश्राम बेडेकर, विजय तेंडुलकर, अरुण साधू, अनिल बर्वे, मंगेश पाडगावकर... अनेकांवर त्यांच्या पश्चात दाटून आलेले शब्द, भावना, प्रसंग, आठवणी अशा लेखांतून ही प्रसिद्ध मंडळी कशी सिद्ध होती ते दाखवतात. प्रत्येक लेखच अप्रतिम... म्हणूनच वाचनीय असा.

*'माणसांहून मोठे काहीच नाही हे ज्यांना कळते, त्यांच्यासाठीच फुले उमलतात'* या पाडगावकरांच्या ओळी दिगमांनी जवळून अनुभवल्या आहेत. स्वत:च्या बहिणीसह व्यवसायातील अशा अनेक आत्मीयांवर लिहिलेले हे लेख वाचकांचे आत्मीय होत जातात.

लेख मनमोकळे होताना शब्दमर्यादा काही प्रमाणात ओलांडण्याची सवलत काही वेळा घेता येते. भावना, प्रसंग, आठवणी यांची दाटी होत असताना असे प्रासंगिक लेख उत्कट होत पसरू शकतात. मात्र पत्रलेखन हा प्रकार तसा अटकर असतो. पत्रे वैयक्तिक असतात, प्रासंगिक असतात, व्यवहार सांभाळणारी असतात. पण अशा पत्रांनाही स्वत:च्या भूमिकेची डोलकाठी असते, आपुलकीचा जिव्हाळा असतो, व्यवहाराला सुंदरतेचा स्पर्श देणारी ताकद असते. सुनीताबाईंनी, जी.एं.नी लिहिलेली पत्रे, ज्योत्स्ना भोळेंची पत्रे, साने गुरुजींची पत्रे... आदींनी वाचकांसाठी वेगळे

भावविश्व तयार केले. दिगमांची पत्रे अशीच मैत्र साधणारी आहेत. 'पत्र आणि मैत्र' वाढवणारा तीनशे पानी खंडच त्यासाठी वाचकांहाती संपादकांनी सोपवला आहे. जोडीला आनंद आगाशे, गोपाळ आवटी, दिलीप प्रभावळकर, प्रशांत दीक्षित, मंगला आठलेकर, सारंग दर्शने, सुजाता देशमुख, सुनीता लोहोकरे यांनी घेतलेल्या मुलाखती आहेत. पत्रांतून, मुलाखतींतून समग्र दिगमा दिसत राहतात. 'माणूस'ची वाटचाल, दिलीपरावांनी केलेले प्रकाशनविश्वातील धाडसी प्रयोग, नंतर 'राजहंस' कारकिर्दीतील लिहिलेला 'जय नावाचा इतिहास', त्यामागची प्रकाशकीय भूमिका, प्रकाशक या नात्याने त्यांनी लिहिलेली पत्रे... असा फार मोठा ऐवज या खंडातून आला आहे. 'न भूतो' असेच याचे स्व-रूप आहे. वाचकांनीही सगळीच पत्रे, मुलाखती मूळातून आवर्जून वाचल्या पाहिजेत.

वि. स. वाळिंबे यांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, 'या पुस्तकानं असा निर्मितीचा आनंद भरभरून दिला... पण माझे सुरुवातीपासून अखेरच्या अवस्थेपर्यंत सहप्रवासी झालात.' (पृ. १०) खरे तर लेखकाचा सहप्रवासी प्रकाशक झालाय दिगमांमध्ये. तो कसा, ते या पत्रापत्रांतून दिसत राहते. पुस्तक तयार झाले की पुस्तकासह पेढ्यांचा बॉक्स आणि प्रकाशकाचे पत्र लेखकाला जाणे म्हणजे केवढा मोठ्ठा सोहळा. अशी पत्रे दिगमा विविध मनोवस्थांतून लिहितात. कृष्णमेघ कुंटे यांच्या 'एका रानवेड्याची शोधयात्रा' पुस्तक प्रकाशनानिमित्ताने लिहिलेल्या पत्राची सुरुवातच गमतीशीर आणि पुढे त्या पुस्तकाचे वेगळेपण. तिथेच पुढे ते म्हणतात, 'काही काळ का होईना, रुपया-पैशाच्या हिशोबाबाहेर याची निर्मितिमूल्यं असावीत असं वाटतं आणि अशी पुस्तकं अखेर तयार होतात'... अशाच भावनेतून तर मग दिगमांसारखा आगळा प्रकाशक घडत जातो. काही पत्रांत 'राजहंस'ने हे पुस्तक प्रकाशित केलं नसतं' (पृ. ३६) असेही ठामपणे ते त्याचमुळे म्हणू शकले.

पत्रांतून प्रकट झालेले दिलीपराव मुलाखतींमधूनही व्यक्त होतात. या सर्वच मुलाखती मुळातून वाचण्याजोग्या. एका प्रकाशकाच्या मुलाखती घेण्याजोग्या वाटणे, हे मराठीत दुर्मीळच. खरे तर मराठीतील अनेक यशस्वी आणि वेगळ्या वाटेने जाणाऱ्या प्रकाशकांच्या मुलाखती प्रकाशित करायला हव्यात. 'दिगमां'च्या त्या झाल्या, ही मराठी प्रकाशनविश्वातील ऐतिहासिक नोंदच. एक माणूस 'माणूस'पासून व्यावसायिक झाला, त्याने विचारपूर्वक प्रयोग केले, प्रतिभा आणि व्यवसाय यांची मोट बांधली, निर्मितीसाठी वेगळी प्रतिभावंत माणसे शोधली-जोडली, चौफेर शब्दपूजा केली, मन आणि वर्तन सतत संवेदनशील ठेवून दृष्टी प्रगत ठेवली. त्याची घडण या दोन खंडांतून वाचकांनाही घडवत जाते.

(*'ललित'*, मे २०२४मधून साभार)

## राजहंसी पार

काय घडलं
'राजहंसी' नगरीत?

## ज्याचं त्याचं एव्हरेस्ट : प्रकाशन




डावीकडून : मंदार परांजपे, उमेश झिरपे, मृणालिनी चितळे, उष:प्रभा पागे, राजा दीक्षित, विनया खडपेकर

मृणालिनी चितळे लिखित आणि राजहंस प्रकाशनतर्फे प्रकाशित 'ज्याचं त्याचं एव्हरेस्ट' ही कादंबरी २३ जून रोजी पुण्यामध्ये प्रकाशित झाली. अध्यक्षस्थानी पुणे आकाशवाणी केंद्राच्या माजी संचालिका आणि गिरिप्रेमी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती उष:प्रभा पागे होत्या. 'सर्वसामान्यांपासून निसर्गाचे अभ्यासक, गिर्यारोहक आणि अध्यात्माचे उपासक या सर्वांनाच हिमालयाचे आकर्षण आहे. अनेकांनी गिर्यारोहणाचे वार्तांकन केले आहे, परंतु हिमालय आणि गिर्यारोहण या संदर्भात मानवी नात्यातील नाट्याच्या अनुषंगाने फार कमी लेखन झाले आहे. 'ज्याचं त्याचं एव्हरेस्ट' ही साहित्यिक निकषांवर लिहिली गेलेली मराठीतील पहिली कादंबरी असावी,' असे मत त्यांनी नोंदवले.

या वेळी व्यासपीठावर राजहंस प्रकाशनाच्या संपादिका विनया खडपेकर, 'महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती'चे माजी अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित, अष्टहजारी मोहिमेचे नेते व ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे आणि लेखिका मृणालिनी चितळे हे मान्यवर उपस्थित होते. श्री. झिरपे म्हणाले, ''शिखर सर

करण्यात अनेक आव्हाने असतात. एव्हरेस्ट शिखर सर करणे, हे तुमच्या शारीरिक आणि मानसिक क्षमतेची परीक्षा पाहणारे असते. चितळे यांनी मोहिमेदरम्यानचे सर्व बारकावे कुशलतेने टिपले असून त्यांचे पुस्तक वाचताना गिर्यारोहण या साहसप्रकाराविषयी असलेले औत्सुक्य वाढेल याची खात्री वाटते.''

हे पुस्तक लिहिण्यामागची आपली भूमिका स्पष्ट करताना चितळे म्हणाल्या, ''एकदा का तुम्ही हिमालयात गेलात, की तुमची पावलं मंतरल्यासारखी त्याच्याकडे पुन:पुन्हा वळतात. हे आकर्षण वैश्विक असतं. हिमालयातील शिखर सर करण्याइतकंच माणसाच्या मनाचा वेध घेणं अवघड. या दोन्ही गोष्टींचा समन्वय साधण्याचा प्रयत्न मी या कादंबरीत केला आहे.''

श्री. राजा दीक्षित आणि विनया खडपेकर यांनी या पुस्तकाचा परामर्श घेतला. प्रेक्षागृहात राजहंसचे संपादक दिलीप माजगावकर, रेखाताई माजगावकर, डॉ. सदानंद बोरसे, शिरीष सहस्रबुद्धे, साहित्य संमेलनाच्या माजी अध्यक्षा अरुणा ढेरे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. डॉ. मंदार परांजपे यांनी सूत्रसंचालन केले. चिंतामणी चितळे यांनी आभार मानले.

## युद्धानंतर... : अनौपचारिक प्रकाशन

आदित्य दवणे यांचा 'युद्धानंतर...' हा कवितासंग्रह राजहंस प्रकाशनाने नुकताच प्रकाशित केला. त्याचे आगळेवेगळे प्रकाशन कवी आदित्य दवणे यांनी केले. त्यांच्याच शब्दात या प्रकाशनाचा हा वृत्तान्त.

*काल काश्मीरमध्ये पुलवामापासून पुढे पेहेलगाममध्ये होतो. पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीची तारीख २२ जून (माझा जन्मदिवस); याच दिवशी ज्यांना पुस्तक आपण अर्पण केलं, त्या युद्धबाधित प्रदेशातील मुलांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन झालं, अशी माझी भावना आहे.*



*पहिल्या छायाचित्रात गावातली मुलं आहेत. त्यांच्या आजोबांना मी आपल्या पुस्तकाची कल्पना सांगितली. ते स्वत: सरकारी शाळेत शिक्षक होते. त्यांनीच अवतीभवतीच्या मुलांना जमवलं. माझा वाढदिवस आम्ही त्यांच्याबरोबर साजरा केला.*



*या दुसऱ्या छायाचित्रात दिसतोय, तो आदल्या दिवसासाठी माझा घोडेवाला होता. त्याच्याशी प्रवासात गप्पा मारल्या, मैत्री झाली. त्यानं मला त्याच्या घरी आमंत्रण दिलं. रात्री मी त्याच्याकडे चहा प्यायला गेलो. पुन्हा तिथे गप्पा मारल्या. त्याच्या कुटुंबाची कहाणी विलक्षण होती. त्याला शायरीचा शौक होता. त्याच्या पत्नीनं जिद्दीनं, आग्रहानं त्यांच्या मुलांना शिकवलं. छायाचित्रात उजवीकडे दिसणारी त्याची मुलगी आज शाळेत शिक्षिका आहे. तिनं माझ्यासाठी इथला स्पेशल नमकिन चहा बनवला. इथला स्ट्रगल मी समजून घेतला. त्यांना मी कवी आहे, असं सांगितलं. त्यांना खरा आनंद झाला. तिथून निघताना आम्ही हा फोटो घेतला.*

❖


अभिनंदन!

महाराष्ट्र साहित्य परिषद, अहमदनगर



स्व. राजीव राजोळे
पुरस्कार

**मोगलाई**

◆

विलास शेळके



# दौशाड : अनौपचारिक प्रकाशन



डावीकडून : मकरंद पाटील, नंदकुमार राऊत, मा. उपमुख्यमंत्री अजित पवार

डॉ. नंदकुमार राऊत यांनी लिहिलेल्या व राजहंस प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या 'दौशाड' या पुस्तकाचे अनौपचारिक प्रकाशन महाराष्ट्र राज्याचे मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) मा. अजित दादा पवार यांच्या हस्ते दिनांक २८ मे २०२४ रोजी मंत्रालयात झाले. त्या वेळी वाईचे आमदार मा. मकरंद पाटील तसेच मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

❖





हे छोटेखानी लेख म्हणजे जणू सोनचाफ्याची फुलंच.
त्यांचा सुगंध जसा मन मोहरवून टाकतो,
तसे हे लेखही सात्त्विक समाधान देणारे,
चौफेर संचार करणारे, प्रेरणेच्या पणत्या
पेटवणारे आणि भावविश्व समृद्ध करणारेही!

ओंजळीतील चाफा

स्वानंद मुकुंद कुलकर्णी

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)



# वाचकांच्या मनातलं...

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

## ओंजळीतील चाफा

ॲड. स्वानंद कुलकर्णी,

आपले 'ओंजळीतील चाफा' पुस्तक वाचले. या पुस्तकातील ७१ चिंतनांमधून शब्दरूपी विचारांचा सुगंध जाणवतो. खूप वाचणे, खूप ऐकणे, अनेक गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव घेणे, एकूणच अनुभवांच्या मुशीतून लेखन उतरले आहे. घराण्याच्या उत्तम संस्कारांचे जे प्रतिबिंब तुमच्या मन:पटलावर उमटले आहे, तेच या पुस्तकात उमटले आहे. बहुश्रुत मर्मज्ञाचे हे सुंदर लेखन आहे.

चांगला माणूस कोणता? ज्याने जीवनाचा सर्वांगीण विचार केला आहे, त्यातून आचार घडला व तो लोकांपर्यंत शब्दरूपाने पोहोचवला; तोच चांगला माणूस होय. याचा प्रत्यय या लेखनातून येतो. 'शाळेतील संस्कार', 'क्षण देण्याचे क्षण घेण्याचे', 'यत्न साक्षेपे जोडावा', 'मूल्य जपण्याची भावना', 'आंतरिक सच्चेपणा', 'वाटांवरचे हरवणे', 'गंधित होऊन जगावे', 'सुवर्ण महोत्सवी साहित्य संमेलन' असे एकेक चिंतन केव्हाही, कुठेही, कुठलेही पान उघडून पुन:पुन्हा वाचावे असे आहे. अध्यात्म, चित्र, चित्रपट, नाट्य, संगीत, सार्वजनिक विचारधारा या सर्वांचेच संमेलन भरल्याप्रमाणे वाटते. वाचक अधिक चिंतनशील होतो, विवेकबुद्धी जागृत होते, हेच या पुस्तकाचे मूल्य आहे.

अजूनही अनेक विषयांवरील चिंतन आम्हाला ऐकायला व वाचायला आपणांकडून मिळावे हीच शुभेच्छा!

आपली हितचिंतक,

***माया कुलकर्णी***

# मी सखा मेघदूत

आत्ताच 'मी सखा मेघदूत' वाचून पूर्ण झालं.

मेघदूत काव्याविषयी ऐकलं होतं. थोडंफार वाचलंही होतं.

तुमचं हे लिखाण वाचून मी अक्षरश: भारावून गेले. एक तर वेगळा आणि नवा विचार तुम्ही यातून मांडला आहे. असं काही सुचणं हीच परमेश्वरी योजना आहे, असं मला वाटतं. याला तुमच्या सखोल अभ्यासाची जोड मिळाली आणि अत्यंत आशयघन अशी निर्मिती झाली आहे.

एक तर हा अवघा प्रवास तुमच्या शब्दांबरोबर घडला. यक्ष-यक्षिणीच्या विरहवेदना उत्कटतेनं जाणवत राहिल्या.

मेघदूत म्हणून निवडला गेलेला पुष्करावर्तक प्राणद मेघ! त्याची ही भावयात्रा फारच विलोभनीय आहे.

मार्गात भेटणारे प्रदेश, डोंगर, नद्या, वृक्षराजी, फुलं, फळं, व्यक्ती या सगळ्यांचं तुम्ही केलेलं वर्णन अत्यंत अभ्यासपूर्ण असंच आहे. यक्षानं बहाल केलेलं मन सोबत घेऊन निघालेल्या या मेघदूतानं किती रम्य प्रवास घडवला!

यात अनेक गोष्टी नव्यानं समजल्या. तुमच्या कल्पकतेला दाद द्यावी तेवढी थोडीच आहे.

शेवटच्या कृतज्ञतेच्या पर्वात या सर्व प्रवासाला पंचमहाभूतांचे संदर्भ दिलेत. एका वेगळ्याच पद्धतीनं त्याला आध्यात्मिक संदर्भ जोडल्यामुळे याला वेगळीच उंची प्राप्त झाली आहे. मानवी मन आणि जीवनविषयक विचारही सुरेख मांडले आहेत.

तुमची भाषाशैली इतकी वैशिष्ट्यपूर्ण आहे, की नकळत वाचक त्या काळात जाऊन पोहोचतो.





कविकुलगुरू कालिदासाचे 'मेघदूत' हे खंडकाव्य म्हणजे अभिजात गीर्वाणभाषेचा एक अनुपम अलंकार! कालिदासाच्या 'मेघदूता'चा जणू 'सीक्वेल' म्हणजे या दूताच्या प्रवासाचे वर्णन करणारे...

मी सखा मेघदूत

हर्षदा पंडित

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)

एका छोटेखानी पुस्तकात खूप मोठा हृदयस्पर्शी आशय सामावलेला आहे. इतकी वैशिष्ट्यपूर्ण आणि अर्थपूर्ण साहित्यनिर्मिती करणं, यासाठी मी तुम्हाला मनापासून अभिवादन करते. अभिनंदनपण करते.

असंच सकस लिखाण तुमच्या हातून व्हावं, आम्हाला त्यानं समृद्ध करावं अशी सदिच्छा व्यक्त करते.

***प्रिया हळबे***

## ॲट एनी कॉस्ट

टीव्ही मालिका आणि त्यात काम करणारे कलाकार, निर्माते, टीव्ही चॅनेल्स, इलेक्ट्रॉनिक न्यूज मीडिया आणि भारताच्या विविध भागांतील प्रेक्षक अशी कॅरेक्टर्स घेऊन लिहिलेली ही सुरेख कादंबरी काल वाचून संपवली. पुस्तक चांगलं पावणेचारशे पानांचं असूनही त्याची लांबी जाणवली नाही. शेवटच्या पानापर्यंत उत्कंठा कायम होती. ही पावणेचारशे पानं केवळ परिच्छेद, वेगवेगळी प्रकरणं, व्यक्तींच्या पेहरावांची आणि परिसराची वर्णनं करून वाढवलेली नाहीत. प्रत्येक ओळीत पुरेपूर कन्टेन्ट आहे हे विशेष. कमालीचं वाचनीय!

स्टोरी थोडक्यात अशी. ब्रेन ट्युमर झालेल्या, तरुण पण ग्रामीण भागातल्या एका नाट्यकर्मीला उभं करून मजबूत टीआरपी खेचेल अशी डिझाईन केलेली एक रिॲलिटी शो-कम-मालिका आणि त्यातून निर्माण झालेले प्रश्न, असा एकंदरीत कादंबरीचा विषय आहे. फिक्शन-नॉन फिक्शनच्या रेषेवरती कादंबरी उभी आहे. अगदी हिंदीतील गाजलेल्या 'राग दरबारी' या कादंबरीसारखी. नक्की वाचावी. जास्त

कला, साहित्य आणि समाज यांच्या मूल्यव्यवस्थांमध्ये
प्रचंड उलथापालथ करून टाकणाऱ्या
छोट्या पडद्यामागच्या भयाण वादळाला
चित्रित करणारी कादंबरी...

ॲट एनी कॉस्ट

अभिराम भडकमकर



आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ३२५/- । (ट.ख. ₹ ५०)

लिहीत नाही. मला खूप आवडलेली काही वाक्यं खाली देतोय.

१. हे बघ, एक तत्त्व सांभाळायचं, आज आलेला माणूस उद्याही या वेळी टीव्हीसमोर आला पाहिजे. बास. उद्याचं उद्या.

२. काय मांडलंय या लोकांनी हे? जे जे विकलं जाईल, ते सगळं सगळं शोकेसमध्ये मांडायचं? अगदी मरणसुद्धा? आपण कुठे आलोय?

३. ‘‘रिसर्च टीमनं कळवलंय, बातम्या रंजक व्हायला हव्यात. रंजक!’’

४. ‘‘बरा आहे टीआरपी (मालिकेचा), पण वाढत नाहीये. आम्ही नवे ट्विस्ट आणतोय. हिरॉईनला जेलमध्ये टाकतोय. हिरोच खलनायक आहे, असाही ट्विस्ट करायचा विचार सुरू आहे. एक एक्स्ट्रा-मॅरिटल अफेअरही आणतोय...’’

५. बिनकण्याची माणसं मोठी करायची आणि आपल्या मर्जीनुसार खेळवायची.


गेली चाळीस वर्षे दिलीप माजगावकरांनी
विविध नामवंतांशी केलेला चिंतनशील व
भावगर्भ पत्रसंवाद, त्यांची विस्तृत मुलाखत,
तसेच ‘दिगमा’ या चतुरस्र व्यक्तिमत्त्वाला
न्याहाळणारे त्यांच्या सुहृदांचे लेख...



**पत्र आणि मैत्र**

दिलीप माजगावकर

दिलीप माजगावकरांनी विविध प्रसंगी
प्रकाशनासंबंधी, साहित्यकृतींविषयी केलेल्या
अनुभवसिद्ध व रसाळ भाषणांचे संकलन
आणि त्यांनी आंतरिक जिव्हाळ्याने
रेखाटलेली अनेक सुहृदांची
आशयसंपन्न व्यक्तिचित्रे...



**वाणी आणि लेखणी**

दिलीप माजगावकर

दोन पुस्तकांच्या संचाची किंमत : ₹ १०००/-
(ट.ख. ₹ १००)

६. आई सगळ्या भक्तांच्या भावुक मुद्रांकडे पाहत राहिली. शिक्षण असलेले, पैसा असलेले. आता यांना कशाला हवी देवाची मेहेरनजर?

एका न्यूज चॅनेलच्या विज्ञान व ज्योतिष या घणाघाती चर्चेवरील खालील ओळी तर माझ्या खूपच आवडत्या आहेत :

बराच वेळ गोंधळ झाला. मग मितेशने (न्यूज अँकर) वेळ कमी आहे म्हणत चर्चा आवरती घेतली. 'ज्योतिष हे शास्त्र आहे असं मानण्याला जागा असेलच असं नाही, पण असंही एक शास्त्र असू शकतं. याचा विचार करत असतानाच समाजात विज्ञानवादाची बीजं रोवायला हवीत; पण ते करताना रूढी-परंपरेतल्या ज्योतिषसारख्या विद्यांचंही संशोधन व्हायला हवं' असा निष्कर्ष त्यानं काढला. अखेर समाजातच प्रबोधन व्हायला हवं असं म्हणून त्यानं सर्वांचे (panelist) आभार मानले.

***प्रसन्न जोशी*** यांच्या फेसबुक पोस्टवरून साभार


**मुखपृष्ठ व मलपृष्ठ यांवरील पुस्तकांविषयी**

- टीव्ही, मालिका आणि बरंच काही...! — किंमत : ₹ ३००/-
  मुग्धा गोडबोले
- ज्याचं त्याचं एव्हरेस्ट — किंमत : ₹ ३५०/-
  मृणालिनी चितळे
- आबली — किंमत : ₹ १००/-
  प्रमोद प्रकाश धायगुडे
- टगी गँग आणि इतर प्रयोगक्षम नाटिका — किंमत : ₹ १७०/-
  अजित ठोसर
- सायबर अ‍ॅटॅक — किंमत : ₹ २९०/-
  डॉ. संजय तुंगार । सुधीर साबळे

कधी न गळणारा

## ‘राजहंसी’ मोहोर

राजहंस प्रकाशनचे अव्वल लेखक,
त्यांची गाजणारी पुस्तकं आणि रसिक वाचक यांची थेट गाठ दर बुधवारी घालून देणारा

**श्रवणीय साप्ताहिक उपक्रम (ऑडिओ पॉडकास्ट)**

**१ मे २०२४पासून सुरू...**

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा

**‘राजहंस ॲप’**

Download on the App Store

आयफोन आणि आयपॅडसाठी

GET IT ON Google Play

अँड्रॉइड फोन आणि टॅब्लेटसाठी

तुम्ही ‘राजहंस’ला असेही भेटू शकता

Website : www.rajhansprakashan.com

## राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com | Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अप्रुप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्प अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ✆ ९८२२८०७७१५.




मुलांमध्ये वाचनाची गोडी वाढावी,
म्हणून जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये
अनेक अभिनव उपक्रम राबविणाऱ्या
एका शिक्षकाने लिहिलेल्या या कथा !

स्थानिक बोली अन् ग्रामीण मातीचा
गंध असलेल्या,
ग्रामीण आयुष्याचे अनेक पदर
वाचकांसमोर आणणाऱ्या...

## आबली

प्रमोद प्रकाश धायगुडे




मुलं आणि पालक या दोघांनाही
डोळ्यांसमोर ठेवून केलेलं खुसखुशीत लेखन.
रंगमंच, अभिनय, कॅमेरा, लघुपट, प्रहसन अशा
अनेक गोष्टींची माहिती आणि
अनुभव मुलांना देणारं लेखन.

मुलांच्या सर्जनशीलतेला वाव देणाऱ्या
सहा नाटिकांचं संकलन -

## टगी गँग आणि
## इतर प्रयोगक्षम नाटिका

अजित ठोसर

Registered
Rajhans Granthavedh
(REGD.NO. : PCW / 133 / 2022-2024 RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO,Pune)
Licence to post without Pre-payment No. - WPP-48

मोबाईलवरून किंवा सोशल मीडियातून
मिठ्ठास संवाद साधून अनेकांना जाळ्यात
अडकवणाऱ्या ठकसेनांपासून
स्वत:चा बचाव करायचा
एकच मार्ग - सजग राहणे,
या जाळ्यात न अडकणे.

त्यासाठीच हे पुस्तक वाचायचे आणि
त्यामधून योग्य ते धडे घ्यायचे,
सावधपणे पुढच्या हाका आधीच ऐकायच्या !

आधुनिक तंत्रज्ञानाच्या मोहक मुखवट्याआडचा
भेसूर चेहरा दाखवणारे -
सायबर गुन्ह्यांबाबत सर्वांना सतर्क बनवणारे -

सायबर ॲटॅक

डॉ. संजय तुंगार । सुधीर साबळे




प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा : राजहंस प्रकाशन.** १०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन : २४४७३४५९

**सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे**